मूल्य रु.१० वार्षिक वर्गणी रु.१२० Visit: http:/www.bsmdadar.com RNI No.1262096 Title Code: MAHMAR45383 Published on 10th July 2015

श्री. वसंत नामे, सौ. शुभदा नामे
पार्ले येथील सुप्रसिद्ध
पार्लेश्वर वडापाव सम्राट
स्वादिष्ट वडापाव



दादर (प)येथे (सुविधाशेजारी)
समारंभासाठी बटाटावडा व समोसाच्या ऑर्डर्स स्वीकारण्यात येतील.

मराठा भुवन (सुभाष रोड), भोगले चौक (नेहरु रोड)
विलेपार्ले (पूर्व) येथेही
9324047619, 9819943106

ॐ
॥ उद्धरेदात्मनात्मानम् ॥

ब्राह्मण सेवा मंडळ प्रकाशित

# स्वयम्

ब्राह्मण सेवा

जुलै २०१५
वर्ष १ • अंक ८



- Deepak Chheda -
98213 30817

Chheda Modak
Estate Consultant
Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon
Contact for : sale-Purchase & Leave Licence of Flats, Shops, Office and RE-DEVELOPMENT PROJECTS

Shop No.3, Sidhachal Building,
Hanuman Road, Vile Parle (E.),
Near Cosmos Bank,
Mumbai- 400 057.
Tel.: 022-26184268/ 69, 26136954
email: chhedamodak@yahoo.com

# गृहप्रकल्प पनवेल-मोर्बे येथे सुरु

**1BHK - 21 Lakh.**
(610 Sq.Ft.)
**1BHK - 18 Lakh.**
(517 Sq.Ft.)

किंमत सर्व करांसहित *
(स्टॅम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन,
सर्विस टॅक्स, व्हॅट,
सोसायटी चार्जेस)*





FREE BUS SERVICE


BUS DEPOT


AITPORT



MUMBAI COA/PUNE HIGHWAY


METRO STATION


RAILWAY STATION



TEMPLE


CHILDREN PLAY GROUND


LANDSCAPE GARDEN


SWIMMING POOL


GYM


CCTV CAMERA

## आपल्या हक्काचे घर घ्या अगदी कमी किंमतीत

वेगाने विकसित होणाऱ्या तिसरी मुंबई म्हणून उदयास आलेल्या व निसर्गाच्या सानिध्यात पनवेल परिसरात आधुनिक सोयी-सुविधायुक्त आपल्या बजेट मधील घरांची मालिका

## ठळक वैशिष्टये

- १७ बिल्डिंग व २७४ घरकुलांचा भव्य प्रकल्प
- सर्व नामांकित बँकांकडून ८० % पर्यंत लोन सुविधा उपलब्ध
  ( SBI, DHFL, BOI & Other Banks)
- प्लान पास प्रकल्प, रायगड जिल्हा कलेक्टर यांची मंजुरी
- पावर बॅक अप सहीत लिफ्ट
- लॅण्डस्केप गार्डन, क्लब हाऊस, जॉगिंग ट्रॅक, चिल्ड्रन प्ले एरीया, मंदिर, कम्युनिटी एरीया, स्वीमिंग पुल, इंटरकॉम सुविधा.
- २४ तास सुरक्षा रक्षक, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा
- शटल बस सेवा इत्यादी.

२० मि. पनवेल रेल्वे स्टेशन पासून ■ २० मि. पनवेल बस डेपो पासून
३० मि. पनवेल इन्टरनॅशनल एअरपोर्ट पासून
१५ मि. एम.आय.डी.सी.सी. तळोजा पासून ■ १५ मि. पेंधर मेट्रो स्टेशन पासून

साईट ऑफिस : एकदंत संकुल, सर्वे नं. २७/२, कोंडाळे गाव, ता. पनवेल, जि. रायगड.

**पनवेल संपर्क : 022 - 27467076 / 8898027676**

**संपर्क :**

**9699734545 / 9821243884 / 9821071540**

Eakadant Realtors, 7, Siddharudh Building, 75 Bhavani Shankar Road, Dadar (W), Mumbai - 400 028

# "तर सांगायचं म्हणजे.."

नमस्कार मंडळी,

चला आला बुवा एकदाचा पाऊस. पहिल्या पावसात भिजण्याचा आनंद बहुतेकांनी घेतला असणारच. वरळी सी फेस, नरिमन पॉईंटला जाऊन समुद्राच्या महाकाय लाटा पाहून आलात ना? नाही? हरकत नाही. अजुनही संधी आहे. अहो, असा आक्रमक निसर्गही एन्जॉय करण्यासारखा असतो. पण अशा ठिकाणी सेल्फीच्या भानगडीत पडू नका बरं का! हे निसर्गाचं रुप नुसतं डोळ्यात साठवून घ्यायचं, पुढल्या वर्षी नव्याने पहाण्यासाठी हातचं राखून ठेवायचं.

आषाढ अधिक महिना सुरू झालाय. अनारशांच्या वाणाची देवाण-घेवाण घराघरातून होतेय. प्रवचन, कीर्तन आणि खास अधिक मासातील धार्मिक कार्य मोठ्या भक्तीभावाने अनेक देवळांमध्ये, संस्थांमध्ये होताना दिसतात.

मागील अंकात कळवल्याप्रमाणे २७ जूनला शाडुची गणपतीची मूर्ती बनवण्याचे प्रात्यक्षिक झाले. अतिशय सुबक मूर्ती घडवली होती. त्याचवेळी श्रीम. संगीता जोशी यांनी लोकांच्या मनातल्या काही धार्मिक तसेच काही तांत्रिक शंकांचे निरसन केले. उपस्थितांनी कार्यशाळेत येऊन यंदाची आपापल्या घरची मूर्ती घडवण्याचे ठरवले आहे. काय मग, तुमच्यापैकी कोण कोण येऊ इच्छितंय? मंडळात दि. १ व २ ऑगस्ट रोजी कार्यशाळा आयोजित करीत आहोत. याविषयी अधिक माहिती या अंकात अन्यत्र दिली आहे.

मंडळाचे शतक महोत्सवी वर्ष आता नजिक येऊन ठेपलंय. काही नवीन उपक्रम हाती घेत आहोत. तसेच कीर्तन स्पर्धेसारखे वार्षिक उपक्रमही असणार आहेत (अंकात त्याची माहिती दिली आहे). मंडळी, तुमच्या सर्वांच्या सक्रीय सहभागाशिवाय आणि थोरामोठ्यांच्या आशीर्वादाशिवाय भरघोस यश पदरी पडू शकत नाही. तेव्हा पुन्हा सर्वांना विनंती करते, आपल्या आवडीच्या समितीत सामील व्हा आणि आपल्या संस्थेचा शतक महोत्सव यशस्वीपणे साजरा करण्यास आम्हाला सहकार्य करा.

आपली ब्राह्मण सेवा मंडळ ही संस्था १०० वर्षे उत्तम रितीने आणि यशस्वीपणे धार्मिक तसेच सामाजिक बांधिलकी जपत कार्यरत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

सौ. कल्पना साठे

## आपला गणपती आपणच तयार करा

दिवसेंदिवस वाढत असलेल्या प्रदुषणाला आळा घालण्यासाठी आपणच घरच्या घरी बाप्पाची शाडूची मूर्ती तयार करु या. त्याचीच पूजा करु आणि घरच्या घरी बादलीत त्याचे विसर्जन करु या. आहे ना अभिनव कल्पना ?

ब्राह्मण सेवा मंडळाच्या तळमजल्यावरील सभागृहात शनिवार दि.१ व रविवार दि. २ ऑगस्ट २०१५ रोजी 'पर्यावरण स्नेही गणपती कार्यशाळा' आयोजित केली आहे.

संकल्पना - पर्यावरण दक्षता मंच, ठाणे
शुल्क - रु. २००० फक्त (सर्व साहित्यासह)
वेळ : सकाळी १- ते सायंकाळी ६ पर्यंत
वयोमर्यादा - वय वर्षे १२ पासून पुढे सर्वांसाठी

नावनोंदणी मंडळाच्या कार्यालयीन वेळेत करावी.


कार्यकारी संपादक
- सौ. कल्पना वसंत साठे

स्वयम् संपादकीय मंडळ
- श्री. विनायक कृष्णाजी लेले
- श्री. संतोष बाळकृष्ण वैद्य
- श्री. अभय अनंत सावरकर
- सौ. अधिता अर्चिस लेले
- सौ. नीला विद्याधर वैशंपायन

संपादन सहाय्य
- हर्डीकर ॲण्ड असोसिएटस्

मुखपृष्ठ
- प्रज्ञा हरणखेडकर

अंक सजावट व मांडणी
- एपीज डिझाईन ॲण्ड प्रिन्टस्



संपादकीय विभाग पत्रव्यवहार
- स्वयम्, ब्राह्मण सेवा मंडळ,
  भवानीशंकर रोड, दादर (प),
  मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : २४२२९११८, २४३७१९४९

कार्यालयीन वेळा : (रविवार बंद)
- सकाळी ८.३० ते १२.३०
  सायंकाळी ४.३० ते ८.३०

ई-मेल : svayambsm@gmail.com
वेबसाईट :www.bsmdadar.com

# ये रे ये रे पैसा...

## गुंतवणूक - आरोग्यातील व शिक्षणातील

-जयंत विद्वांस

आज आरोग्य आणि आपला व्यवसाय या मधील गुंतवणूक पाहू या.

आज भारतातून मोठ्या शहरांतून चाळिशीच्या आतच हृदयविकारांनी ग्रस्त तरुण आढळतात. याला कारण आपण स्वीकारलेली नवीन जीवनशैली.

आर्थिक नियोजन करतांना कुटुंबाच्या खर्चाचा तपशील नियोजनकार मागतात. बहुतेक सर्वजण एकत्रित महिना खर्च इतका, असे लिहितात, फार थोडे जण खर्चाचा तपशील सांगतात. यात दूध, फळे, भाजीपाला, जिम, हॉटेलचा खर्च या तपशिलावरून रहाणीमानाची पद्धत लक्षात येते. दूध, फळे, जिम या वर फुली आणि हॉटेल खर्चासमोर मोठा आकडा दिसला की मोठ्या रकमेचा आरोग्यविमा सांगितला जातो. हल्ली सर्व संस्था आपल्या कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य विम्याची सोय करतात. कंपन्यांसाठी कर्मचाऱ्याच्या किंमतीत संपूर्ण कुटुंबासाठी आरोग्यविम्याच्या हप्त्याची रक्कम मिळवलेली असते. म्हणजेच तुम्हाला वर्षाकाठी कंपनी पंचवीस ते तीस हजार रुपये कमी देते. वर्षाच्या सुट्या मर्यादित असतात. आपले आरोग्य नीट नसेल तर कॉस्ट टू कंपनी वाढत जाते. मग पाच वर्षांनी कंपनी आपल्या खर्चाचा पुनर्विचार करते.

अमेरिकेत, एका कंपनीचे चेअरमन वारंवार आजारी पडत होते. वार्षिक सर्वसाधारण सभेत एक भागधारक उभा राहिला आणि त्या चेअरमनना उद्देशून म्हणाला ''सर, आपण आपली तब्येत नीट राखू शकत नाही. आमच्या कंपनीची कशी राखणार? आमच्या आणि कंपनीच्या भल्यासाठी आपण निवृत्ती स्वीकारल्यास बरे होईल'' भारतात कंपनीचे चेअरमन बहुतेकवेळा सर्वात मोठे भागधारक असतात म्हणून आपण त्यांना हे सांगू शकलो नाही तरी कंपनीचे संचालक, कर्मचाऱ्यांना हे सांगू शकतात.

परदेशांत सरकारतर्फे नागरिकांच्या सुदृढतेसाठी काळजी घेतली जाते. काही देशांत चॉकलेटच्या पाकिटावर 'जास्त खाणे आरोग्यास अपायकारक' असे छापणे बंधनकारक आहे (सिगारेटच्या पाकिटावरील वैधानिक इशाऱ्याप्रमाणे). ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यांसाठी भरपूर फळे ठेवली असतात. ऑफिसमध्येच जिम किंवा ध्यानधारणा, योगारूम असते. भारतात इन्फोसीस सारख्या फारच थोड्या संस्थांमध्ये ह्या सोयी आढळतात. परंतु, ह्या सोयींचा उपयोग न करता आजच्या काळांत सॉफ्टवेअरमधील मुले पहिल्या पाच दिवसांचा रोज बारा तास काम केल्याचा शिणवटा घालवण्यासाठी शनिवार, रविवार पब मध्ये घालवतात.

आपल्या देशात आपले सरकार किंवा आपण नोकरी करीत असलेली संस्था कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणार नसतील तरी ही काळजी आपली आपणच घेणे ही जबाबदारी आपलीच आहे. यासाठी पैसा आणि मुख्यत्वे वेळेची गुंतवणूक करणे गरजेचे आहे. आपले सुदृढ शरीर ही आपली मोठी संपत्ती आहे. नंतर घरदार व इतर संपत्ती हा विचार लहानपणापासून रुजवला पाहिजे. आज लहान मुले सुद्धा मैत्री करतांना आपली गाडी, सदनिका यांची तुलना करून करतात.

वैज्ञानिक सुधारणांमुळे आपले आयुर्मान वाढले आहे. परंतु नुसतेच आयुर्मान वाढून, शरीर धडधाकट नसेल तर मिळवलेली संपत्ती उपभोगता येणार नाही. आज जास्तीत जास्त संपत्ती मिळवण्याच्या, गोळा करण्याच्या हव्यासापोटी आपण आपले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ गमावून चालणार नाही.


### ज्ञानार्जनातील गुंतवणूक

पूर्वी आयुष्यातील सुरवातीची २५ वर्षे ज्ञानार्जन नंतरची २५ ते ३५ वर्षे अर्थार्जन (मग वानप्रस्थाश्रम व नंतर संन्यास) असे गृहीत धरलेले असायचे. बाह्य परिस्थितीत विशेष बदल घडत नसल्याने आधीच्या २५ वर्षात शिकलेले आयुष्यभर उपयोगी पडत असे. आता दर दीड-दोन वर्षात नवीन उपकरणे बाजारात येत असतात. नवीन ज्ञानात भर पडत असते. हे ज्ञान आपण शिकलो नाही तर आपण आपल्या क्षेत्राच्या बाहेर फेकले जातो. आज टेपरेकॉर्डर जाऊन सीडी प्लेअर आले. टेपरेकॉर्डर दुरूस्ती करण्याचे ज्ञान आज उपयोगी राहिले नाही. ऑल्विन टॉफलर यांनी म्हटल्याप्रमाणे, **'एकविसाव्या शतकात अशिक्षित या शब्दाचा अर्थ ज्याला लिहिता वाचता येत नाही असा नसून ज्याला शिकता येत नाही, आधी शिकलेले विसरून नवीन शिकता येत नाही असा आहे'**.

भारतीय प्रबंधक संस्था, अहमदनगर (आय आय एम) मधून पंचवीस वर्षापूर्वी एम बी ए झालेला व्यक्तिच्या ज्ञानात वा अभ्यासक्रमात व आज एम बी ए होणाऱ्या व्यक्तिमध्ये किती फरक असेल? हा फरक भरून काढला नाही तर आपण कालबाह्य होऊ. हे होऊ नये म्हणून आयुष्यात प्रत्येक टप्प्यावर नवीन शिकावे लागेल. हे शिकण्यासाठी आर्थिक गुंतवणूक करावीच लागेल. दर चार-पाच वर्षांनी नवीन अभ्यासक्रम/कोर्स करावे लागतील. यासाठी कदाचित नोकरीत अल्पविराम घ्यावा लागेल. शिक्षणाचा खर्च व नोकरीतील अल्पविराम काळातील खर्चाची तरतूद आधीच्या तीन-चार वर्षांत करावी लागेल. आजच्या तरुण पिढीला याची हळूहळू जाणीव होऊ लागली आहे. तरुण जोडपी आर्थिक नियोजनकारांना आवर्जून दोघांच्या पुढील शिक्षणाची तरतूद करण्याचे नमूद करतात. पुष्कळ कंपन्या आपल्या प्रमुख कर्मचाऱ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देतात. शिक्षणखर्च व रजा देतात. इतर सर्व कर्मचाऱ्यांसाठी ज्ञानवृद्धीसाठी लहान प्रशिक्षण शिबीरे आयोजित करतात.

आज वाढत्या आयुर्मानानुसार साठाव्या वर्षी निवृत्त होता येईलच असे सांगता येत नाही. आपले रहाणीमान टिकवून ठेवायचे असल्यास निवृत्तीनंतर काही काळ पूर्णवेळ किंवा अर्धवेळ काम करावे लागेल. या काळात नवीन नोकरी/व्यवसाय करण्यासाठी काळानुरूप ज्ञान मिळवणे आवश्यक असेल. या स्वरूपातील गुंतवणुकीचा परतावा प्रचंड असतो. शेअर बाजारातील गुंतवणूक काही काळ उणे परतवा देऊ शकते. ज्ञानार्जनातील गुंतवणूक मात्र कायमच निश्चित परतवा पुढील काही वर्षे देते.

आर्थिक नियोजनकाराकडे येतांना अशिलाचा उद्देश आपल्या आर्थिक बाबी सोप्या, सुरळीत व्हाव्यात, आपले रहाणीमान सद्यस्थितीपेक्षा दोन पावले पुढे जावे हा असतो. फॅमिली डॉक्टरप्रमाणे आर्थिक नियोजनकार कुटुंबाचा एक सदस्य होतो. आर्थिक नियोजन करता करता गुंतवणूक व वैचारिक विसंगती आढळतात. या विसंगती **RICH** शब्दाच्या माध्यमातून मांडल्या.



**जयंत विद्वांस**
9892202011
jayantvidwans61@rediffmail.com

# हसत लिखित

## बायकोबरोबर साडी खरेदी

- अनिल हर्डीकर

लग्नाला वर्ष उलटण्यापूर्वी किंवा मंगळसूत्राच्या वाट्या सरळ होण्यापूर्वी घटस्फोट व्हावा असं कोणत्या नवऱ्याला वाटेल ? माझीही तशी इच्छा नव्हती. म्हणून मी बायकोसह शॉपिंगचा मार्ग निवडला. मला खरेदी जमत नाही. मी कधी काही खरेदीच केलं नाही असं नाही, पण मी केलं तो 'देई वाणी घेई प्राणी' असा मामला. लग्नाला वर्ष व्हायचंय म्हणून मी हिचं लाळघोट्या नवऱ्यासारखं कौतुक करतोय असं समजू नका पण हिला 'शॉपिंग' हा कोर्स करण्याची इच्छा होती. आता विद्यापीठात ती शाखा नव्हतीच त्याला ही तरी काय करणार ? अन्यथा तिची या क्षेत्रात पी. एच. डी. आहे.

काहींना अभिनयाचं अंग असतं. काहींना नृत्याचं अंग असतं तसं हिला खरेदीचं अंग आहे. माझा रोकडे नावाचा मित्र आहे त्याला शेजारी पाजारी, नात्यागोत्यात मर्तिक झालं की कोण आनंद होतो ! म्हणजे गेल्याचं दु :ख असतं पण पुढच्या 'कार्यात' सहभागी व्हायला मिळणार या आनंदानं त्याचं उर भरून येतं. त्याला काय करू आणि काय नको करू असं वाटायला लागतं, डेडबॉडीला कुठे ठेवू आणि कुठे नको असं होतं. तद्वत माझ्या पत्नीला खरेदी 'चढते'. 'खरेदी करायची' असं म्हटलं तरी हिच्या अंगात संचारतं. खरेदी काय करायचं आहे हा मुद्दा इथे गौण आहे. भांड्यांची खरेदी असो, रुपवर्धक कॉस्मेटिक असोत, चपला-पर्स अशी रुटीन खरेदी असो वा साडी असो, उत्साह तोच. या लिस्टवर अपवाद औषधांच्या खरेदीचा. भरपूर वेळ, अटीतटीची घासाघीस. भरपूर व्हरायटी, पुरेपूर दमछाक या सर्व बाबींनी युक्त खरेदीत तिला कमालीचा रस आहे.

आमच्या 'बघण्याच्या' कार्यक्रमाच्या वेळी तिचं गाण्याचं अंग कळलं होतं. पाककलेचं कळलं होतं. खरेदीचं अंग लग्नानंतर कळलं. त्याचं झालं असं की बायकोचा वाढदिवस लक्षात ठेवायचा असतो हेच मी विसरलो होतो. हिच्या वाढदिवसाआधी चार दिवस धाकट्या मेव्हणीचा फोन आला. बाय दे वे, जाताजाता संसारातली एक खंत सांगतो. धाकट्या मेव्हणीचा फक्त फोन येतो आणि मोठी मेव्हणी 'आलेच होते या बाजूला' म्हणून अनेकदा आमच्याकडे येते. असो.

फोनवर धाकटी मेव्हणी हे माहित नसताना मीच फोन उचलतो, 'कसे आहात दिगंबर ?'... 'तुम्हाला मी पंत म्हणू की राव म्हणू ?', 'अगं काहीही म्हण' हे माझं म्हणणं न ऐकता ती पुढे बोलायला लागते. 'ताईच्या वाढदिवसाला काय देणार ?'

'सरप्राईज' मी म्हणालो.

'पण काय ?' मेव्हणी.

'मग सरप्राईज काय राहिलं ?' मी.

'अय्या, खर्च !...माझं ऐकाल ? साडी घ्या.'

मी फोन ठेवण्यापूर्वी 'एवढंच ना!' म्हणालो खरा, पण एवढी एकच खरेदी करतानासुद्धा 'काही खरं नाही' असंच मला वाटलं. ही तश्या साड्या कमीच नेसते. ऑफिसला पंजाबी ड्रेस कम्फर्टेबल वाटतात, घरी गाऊन. एवीतेवी साडी फंक्शनला वगैरे.

मी ऑफिसात रिमा नावाच्या माझ्या कलीगशी हा विषय काढला.

''मला साडीतलं काही कळत नाही आणि बायकोच्या पहिल्या वाढदिवसाची लग्नानंतर भेट म्हणून साडी घ्यायची आहे''

मी सब्जेक्टमॅटर सांगितल्यानंतर कामापेक्षा इतरांची बोलणी जास्त ऐकणारा नाडकर्णी मध्येच म्हणाला,

''मूर्ख असशील तर बाहेरच्या कुणा बाईला ही खरेदी करायला सांगशील, आयुष्यभर अंगाला साडी लावणार नाही तुझी बायको....कदाचित तुला ही.'' नाडकर्ण्यानं प्रसंगाचं गांभीर्य लक्षात आणून दिलं.

मग मी हिला सरप्राईज म्हणून साडी घ्यायचीय तीही तुझ्या पसंतीची, असं म्हणून गुंता सोडवला. तर ही काय तितकीशी खुश दिसली नाही, म्हटलं हिला गाडी हव्येय की काय ?

मग विक्रमी पॉझनंतर ही म्हणाली,

'माझ्या पसंतीची साडी मी कधीही घेऊ शकते, मला तुझ्या पसंतीची भेट म्हणून आवडेल' या प्रस्तावाला मी तोंडी संमती दिली.

दुसऱ्या दिवशी दोघांनी ऑफिसेस सुटल्यावर दादरला भेटायचं ठरलं. हिला सासरमाहेर यापैकी आवडतं ठिकाण कोणतं असं विचारलं तर ही 'दादर ' सांगेल.

खरं म्हणजे आमच्या इथे साड्यांची दुकानं नाहीयेत का ? पण मी हा फजूल प्रश्न विचारला नाही. दुकानदारांचा अलीकडे ग्राहकांकडून पैसे हवेत असा आग्रह नसतो. कार्डही चालतात. असो.

दादर स्टेशन आणि संध्याकाळची वेळ, मग काय विचारता ? मी जवळून जाणारी, समोरून येणारी प्रत्येक बाई हीच नाही ना म्हणून पहात होतो. अगदी खरं सांगतो, थांबलो असतो तर हिच्यापेक्षा बरा पीस मिळाला असता असा विचार मनात आला आणि कधी नव्हे ती ही वेळेवर आली.

'सॉरी, मला उशीर झाला' हिनं दिलगिरी व्यक्त केली.....काय करत होतास ?

'साड्या पहात होतो' मी खरंखुरं सांगितलं.

'चावट कुठला!' असं ही म्हणाली आणि मिनिटापूर्वी आलेला उनाड विचार मनात यायला नको होता असंही वाटलं मला.

'कुठे जाऊ या ?' हिनं विचारलं.

'साडी घ्यायच्येय, साड्यांच्या दुकानातच जावं लागेल.' मी म्हणालो. मग हिनं 'जरी'ची काही यमकं ऐकवली. ती दुकानाची नावं होती. त्यातल्या एका नावाची 'री' मी ओढली. दुकानाच्या दाराशी मिशाळजी दरवान होता. त्याला शिकवल्यानुसार दाराबरोबर तोंडही उघडून खूप जुनी ओळख असल्याची शुभ्रपंक्तीची पावतीही दिली. आत हवा कन्डीशन्ड होती. काऊंटरपलीकडे हीऽ गर्दी होती. पलीकडचे चेहरे हसतमुखाने आमच्याकडे पहात होते. आम्ही काऊंटरशी गेल्यावर सेल्समन म्हणाला, 'बसता ?' 'उभ्यानं करू' मी म्हणालो. हिनं मला नजरेनं एका बाजूला घेतलं आणि म्हणाली, 'अहो, बसता कां नाही विचारलंन त्यानं, बस्ता म्हणजे लग्नाची खरेदी का ?, असं विचारलंन.'

सामान्य ज्ञानाचा माझा क्लास संपल्यानंतर आम्ही साड्या पहायला सुरूवात केली. हिनं शोकेसमधल्या, मी इतर. कितीतरी साड्या रंग, नक्ष्या घड्या घालून दुकानात ठेवलेल्या होत्या. मायाजालच ते. स्थितप्रज्ञ सेल्समन प्रत्येक साडी उलगडून दाखवत होते. दिसताहेत त्या रंगापेक्षा त्यांच्या अंगचे गुण पटवून देत होते. हिचं कुणाशी जमेल सांगताना समोरच्या 'बहिणीला' पैशाची काळजी करू नका असा भरोसा देत होते. दूधवाले, भाजी विकणारे भैय्या आणि साड्यांच्या दुकानातील विकत घेणाऱ्या बहेनजी, भाभीजी ही नाती गमतीशीर वाटतात.

काऊंटरच्या अलीकडे बायकोचा हात धरून आलेले माझ्यासारखे काही जण होते, पण अल्पमती, अल्पसंख्यांक होते. हिनं एका चुणचुणीत सेल्समनला हेरलं, भाईसाहबची राखी बांधली आणि त्याचं ग्रहमान फिरलं. वो वाली दिखाना...वो नही वो वो, वो वो करत, सेल्समनच्या मागची आख्खी शोकेस काऊंटरवर आली. साड्यांच्या गर्दीत मी प्यान्टशर्टसह गहाळ होऊ नये म्हणून हिनं मला जवळ खेचलं आणि म्हणाली, साडी मला तुमच्या पसंतीची हवी आहे. बजेट किती?, हिच्या प्रश्नाला सेल्समनने कान टवकारले आणि 'कार्ड आहे' या उत्तरानं त्याच्या मनाच्या कढईत आनंदाच्या उकळ्या फुटल्या.

प्रत्येक साडीची जात, कंपनी, रंग ही सारी नावं मला नवखी वाटत होती. रंग मला इंद्रधनुष्यात पाठ केलेले तेवढेच माहिती होते. इथे लेमन यलो होता. ब्लडी रेड होता, स्काय ब्ल्यू होता.....

'बॉम्बे ब्ल्यू दिखाना' मी म्हटलं तसा सेल्समन म्हणाला, 'कल आयेगा वो माल'

आपल्याला बऱ्याच गोष्टींचं ज्ञान नाही हे ज्ञान मला झालं. साड्यांच्या घड्या घालण्यासाठी दुकानात एक स्वतंत्र माणूस होता. त्यामुळे सेल्समन साड्या उलगडून दाखवत असताना हात आखडता घेत नव्हते. खरेदी होण्यापूर्वीच फॅन्टा, थम्सअपची राऊंड झाली. नको नको म्हणत आम्ही ते घेतलं. ही साड्या बघत होती पण मध्येच उबळ आल्यासारखी 'तुझ्या पसंतीची साडी हवेय मला' असं म्हणायची. मग मीही एकदोन साड्यांकडे बोट दावून त्यांना काऊंटरवर आणायचो. मग ही सुद्धा आणखी चारपाच साड्या शोकेसमधून उतरवायची. सरतेशेवटी शॉर्टलिस्ट होऊन दहा साड्या समोर आल्या, त्यात माझ्या निवडीच्या सहा होत्या.

'भाईसाब, अब आपकी बारी...' काऊंटरवरचा सेल्समन म्हणाला. त्याच्या 'बेहनजीचा मी भाई' हे नातं बुचकळ्यात पाडणारं होतं. एका फटक्यात मी दहा साड्यांमधली मला आवडलेली साडी काढली.

'ही घे'.

'नको, ही खूप महाग आहे.'

'पैशाचा प्रश्न नाही'

'माझे खूप वाढदिवस आहेत अजून, उगाच एवढे पैसे कशाला?'

मी हिच्या काटकसरी स्वभावाचं कौतुक केलं. दुसरी माझी आवडती साडी पुढ्यात घेतली.

'ही माझी पसंती'.

'तुम्ही म्हणत असाल तर घेते पण माझी लग्नापूर्वी अशीच एक होती. एकच आयुष्य, एवढी डिझाईन्स, मग रिपीट का करा?'

मला हिचं म्हणणं पटलं, मी यू आर राईट असं इकडे तिकडे म्हणत बोललो तरी माझे कान तिच्याचकडे होते.

माझ्या तिसऱ्या क्रमांकाची पसंती असलेली साडी 'गॉडी' आहे असं ही असा काही चेहरा करून म्हणाली की त्यात गोडी उरली नाही.

मग मी म्हणालो, 'साडी तुला नेसायची आहे, मी फक्त बघणार आहे'

'चावट कुठले!' असं ही सेल्समनला ऐकू जाणार नाही एवढ्या हळू दबक्या आवाजात म्हणाली.

'साडी तूच घे तुझ्या पसंतीची' ह्या माझ्या वाक्याला मात्र हिचा विरोध होता.

माझी चौथी पसंतीची साडी नापास व्हायची काहीच शक्यता दिसत नसताना हिनं 'मिस मेहताची आहे अशाच डिझाईनची' असं म्हणून निकाल लावला.

'मिस मेहता कोण?' मी विचारलं

'तुम्हाला नाही माहिती'

'म्हणून तर विचारतोय'

'आहे एक नटवी ऑफिसात, तिला वाटेल तिची बघून मी घेतली'

'वाटेना' मी म्हणालो.

'ते तुम्हाला तुम्हा पुरुषांना नाही कळणार'

संपलं. मी माझ्या एकट्यापुरता वाद घातला असता. इथे समस्त पुरुषवर्गाची जबाबदारी माझ्यावर आली.

मी हिरमुसलो, हिच्या ते लक्षात येऊन, ही म्हणाली, 'असं हो काय करता?'

त्या भरल्या, बहरल्या दुकानात कितीही काही करायचं मनात आलं असतं तरी मी काय करणार होतो? बायकांचा असा वेगळाच शब्दकोश असतो आणि त्याचे अर्थ जागा, वेळ बदलताच बदलतात, हे वर्षाच्या आत माझ्याही लक्षात यायल लागलं आहे. मी म्हणालो,

'माझ्या पसंतीची साडी घ्यायची ह्या अट्टाहासाला काय अर्थ आहे?'

'मग मला साडीच नको'

मी चोरून सेल्समनकडे पाहिलं, तो हसत होता, त्याचा तो प्लास्टीक सर्जरी केलेला हसरा चेहराही मला बघवेना.

मग मी माझ्या पसंतीच्या अगली पायदानवर असलेल्या साडीला हात लावला.

'कित्ती छान!, पण हा कलर किनई मला अनलकी आहे. तू म्हणत असशील तर......'

'अनलकी असलेली गोष्ट कशाला घ्या!' मी निर्णयाच्या दिशेने आगेकूच करण्यासाठी शॉर्टकट घेतला.

अखेर माझ्या पसंतीची शेवटची साडी आली. बायको म्हणाली, ''ती फारच सुळसुळीत असते, पारदर्शी असते, ती घेतली की आणखी खर्च, पुन्हा तुला माहित्येय पुरुषांच्या नजरा.....''

मी ज्या बाहुल्यांना कपडे नेसवायला पुरुषच लागतात अशांवरची नजर हलवली...

दुकान बंद होण्याची वेळ आली, मालकानं गल्ला मोजायला घेतला त्यावेळी बायकोलाच आवडलेली साडी, ''मला आवडली'' असं माझ्या तोंडून वदवून घेऊन, 'नाहीतर तू म्हणशील' ची फोडणी घालून घेण्यात आली.

''ही कशी वाटते?''

''हा काय रंग आहे?'' असं मी एरवी म्हणालो असतो. त्या जागी ''वा! काय रंग आहे'' असं म्हणालो.

''फील बघ ना कित्ती छान'' ही म्हणाली.

खरखरीत फील वाटूनही फीलगुडचं मी एक्स्प्रेशन दिलं.

''.....आणि किंमतही फार नाही''

मी क्रेडीट कार्ड काढलं.

डोळे उघडून किंमत बघण्याची माझी हिंमत झाली नाही. ही साडी पहिल्यांदा मी पाहिली होती तेव्हा सेल्समननं सांगितलेल्या किमतीवरून मी नावडतीच्या कप्प्यात टाकली होती. असो.

दुकानाच्या बाहेर पडल्यावर प्रचंड भूक लागल्याचं आमच्या लक्षात आलं. हॉटेलचं बिल भरल्यावर भूक प्रचंडच होती याची खात्री झाली.

पुरुषांना आवडतं ते बायकांना आवडतंच असं नाही. किंबहुना आवडत नाहीच आणि बायकांना पुरुषांना पटवायची एक जन्मजात सिद्धी असते हे शिकण्यासाठी १४६० रुपये ही फार मोठी फी पडली असं मला वाटत नाही.



-अनिल हर्डीकर
स. क्र. ५२७० | 9819421858
hardikarsutradhar@gmail.com

# ब्रह्मभूषण

## हे विमान फिरते अधांतरी

**- सुरेश (रा.त्रिं.) बर्वे**

**नील नदीतून कापीत पाणी**
**हा मत्स्य धावतो चहुबाजोनी**
**घारच अथवा फिरते गगनी**
**नवल नव्हे का खरोखरी**
**हे विमान फिरते अधांतरी**

ही कविता अनेकांची तोंडपाठ असणार. लहानपणी बहुतेक जणांकडे खेळण्यात एखादे तरी विमान असतेच. पण साधे खेळण्यातले विमान न परवडणाऱ्या, मुरूड सारख्या आडगावी जन्मलेल्या, महादेव भटाच्या नशिबी नियती भिक्षुकी लिहीत होती व 'कसाबसा संसार चालवावा व काटकसर करून एखादी गाय पाळता आली तर हात आकाशाला टेकले' हे स्वप्न. पण महादेव नियतीला म्हणाला की, ''मी गोठा बांधीन पण गोठ्यात एका गाय कशाला अनेक विमानं पाळीन.'' मग मात्र नियतीने साथ दिली पण अनेक परीक्षा घेऊनच.

महादेव जोशी भिक्षुकी करत हरीभाऊ जोशी ह्या दशग्रंथी ब्राह्मणाकडे याज्ञिकी शिकत होता व थोडी शेती बघत होता. दोन मोठे भाऊ मुंबईला होते पण ते त्याला मुंबईत शिकवायला तयार नव्हते. पण महादेवचे मोठे स्वप्न त्याला स्वस्थ बसू देईना. काशी विद्यापीठात शिक्षण मोफत मिळे म्हणून महादेवने प्रवेशही मिळवला. पण महादेवची मागे आलेली थोरली बहीण पुण्यात शिक्षिका होती. तिला महादेवचे लांब जाणे पटेना म्हणून तिने मोठ्या अडचणीत महादेवचा फक्त शिक्षणाचा खर्च उचलण्याचे मान्य केले. महादेव मुंबईत आला तो प्राचार्य काळ्यांच्या आर्यन शाळेत. महादेव हुशार, त्यामुळे काळेसरांचा त्याच्यावर जीव. त्यांनी महादेवला घासून पुसून चकचकीत केले. मॅट्रीकची परीक्षा पास होताना महादेव शाळेत सर्वप्रथम आला व त्याला पोर्ट ट्रस्टमध्ये नोकरी मिळाली. पण लवकरच पगार जरा बरा म्हणून म्युनिसिपालिटीत चिकटला. नोकरी करताना रुईया कॉलेजमध्ये शिक्षण घेऊन महादेव बी.ए. झाला तोही इंग्रजी प्रथम विषय घेऊनच. सोबत मित्र व माणसे जोडण्याचे काम चालूच होते. त्यात त्याला गवसले ते नाना राऊत. नाना राऊत रुईयाशेटना जवळचे व त्यांचेकडेच नोकरी करत. त्यांनी महादेवचे मनावर बिंबवले की, नोकरीत काही खरे नाही म्हणून धाडसी पाऊल उचलायला हवे आणि विचारले, ''येणार का आमच्या रुईयाकडे?'' काम जबरदस्त, शिवाय रुईयाशेट नाराज झाले तर हाती नारळ. पण स्वतंत्र व्यवसाय कसा करावा व उद्योगातल्या खाचा खोचा कशा हाताळाव्यात ह्याचे उत्तम प्रशिक्षण. पण कुटुंबात मात्र हलकल्लोळ. 'आताच्या नोकरीत काम करा अगर न करा, पगार मिळणारच, असे असताना ही धोक्याच्या खड्ड्यात उडी मारण्याची अवदसा का?' येथेच नियती परीक्षा घेत होती.

महादेव रुईयाशेटकडे काम करू लागला. ती आकाशात घेतलेली झेपच ठरली. महादेव इंग्रजीत तरबेज होताच पण येथे त्याने हिंदी व गुजराती भाषांवर प्रभुत्व मिळवले. खास करून इंग्रजी पत्रव्यवहार व बँकींगचे व्यवहार सांभाळू लागला. मालकाकडे येणारे सारेच करोडपती. आपल्या आर्जवी व नम्र स्वभावाने महादेवाने ह्या सर्वांनाच जिंकले. ह्या लोकांचे प्रकल्प काय व कसे असतात, त्याची आखणी कशी होते, बँकेतून भांडवल कसे मिळवावे ह्याचे बाळकडूच महादेवला मिळाले. रुईयाशेटपण खूष. लंच, डिनर, पार्ट्या, क्लब एवढेच काय क्रिकेटची मॅच बघताना पण शेटजीना महादेव जवळ लागे. सारे काही आलबेल. पण लगेच नियतीची परीक्षा.

१९४५ चा सुमार. मालकाकडे येणाऱ्या गोवर्धनशेटचा महादेववर लोभ व दाट परिचय. हे नवे शेट म्हणाले की ''युरोपला जावे असे म्हणतो. युध्द संपले आहे. पण मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. ती निस्तरणार कोण? म्हणजे कामे असंख्य निघणार. त्या लोकांना मदत व पैसा लागणारच. ते सर्व मी जमवू शकेन.'' महादेव म्हणाला, ''उत्तम, मग अडले कुठे?'' शेट उत्तरले, ''सर्व काही आहे पण इंग्रजीची बोंब. मला सहाय्यक हवा आहे, येणार का?'' महादेव तयार झाला. रुईया शेटनी आशीर्वाद दिले. पण कुटुंबात पुन्हा आदळआपट. 'काय अवदसा आठवली आहे, झाले' असे टोमणे. पण महादेव गेला व भारतात परतला तो महादेवभाई बनूनच.

नव्या शेटजीने महादेवचे जीव टाकून सहाय्य केले. इतके की गोवर्धनभाईंना महादेव धाकट्या भावासारखा वाटू लागला. त्यानी धंद्याच्या खाचा खोचा शिकवल्याच पण बजावले की ''आता तू भारतात परतायचे ते मालक बनूनच. ह्यापुढे नोकरी करणे हा शब्द उच्चारायचा पण नाही. अनेकांना आता नोकऱ्या द्यायच्या. स्वत:साठी काही व्यवसाय बघ.'' त्यामुळे महादेव स्वत:साठी इंग्लंडच्या हार्टफोर्ड डिझेल कंपनीची भारतासाठी सोल एजन्सी घेऊन परतला. भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. उत्पादन वाढत होते. डिझेल इंजिनांना अफाट मागणी. मग काय, पाण्यासारखा पैसा, मेडोज स्ट्रीटवर चकचकीत ऑफिस, इंपोर्टेड गाडी, उंची पोशाख, महादेव डिझेल इंजिनात तज्ञ व्यापारी बनला. काळेसरांचा दुसरा आवडता विद्यार्थी व महादेवचा वर्गमित्र बनारसहून इंजिनिअर होऊन परतला होता. त्याला महादेवने भागीदार म्हणून घेतले. डिझेल इंजिन भारतातच बनवायचा प्रयत्न चालू केला. नियती मधे आली म्हणून, नाहीतर महादेवचे डिझेल इंजिन किर्लोस्करांच्या आधी तयार होते. पण नियती म्हणाली, '' महादेवा तुला गोठ्यात (हँगरमध्ये) विमाने पाळायची आहेत ना? मग ही घे संधी.'' कारण पाकिस्तान झाले व आसाम भारतातून अलग पडले. विमान हे एकच वहातुकीचे साधन उरले. बँकेकडून पैसा कसा आणावा. ह्या कलेत तर महादेव तज्ज्ञ झाला होताच. त्याने ३/४ डाकोटा विमाने पैदा केली व कलकत्ता-दिब्रुगड वहातूक करणारी 'एअर लिफ्ट सर्व्हिसेस ऑफ इंडिया' ही कंपनी स्थापन केली. मग काय, 'उप्परवाला जब भी देता, छप्पर फाडके देता' असा छप्परतोड धंदा व छप्परतोड पैसा. पण नियती पुन्हा हसली व म्हणाली, ''महादेवा अजून एक परीक्षा''. ह्या वेळेस 'कथा कोणाची, व्यथा कुणा' नावाची वेगळीच परीक्षा.

इराणमध्ये राज्यक्रांती झाली. अचानक मुसादिकची हकालपट्टी झाली. तेव्हा भारतात

एव्हीएशन फ्युएल म्हणजे विमानांना लागणारे खार पेट्रोल इराणमधून येई. ते बंद म्हणजे महादेवाची विमाने गोठ्यात बंद. ह्याचाच अर्थ पैसा बंद. एवढे दिवस महादेवपुढे हांजीहांजी करणाऱ्या बँका पैशासाठी तगादा लावू लागल्या. भागीदारांची तर गाळणच उडाली, कारण 'घी देखा लेकिन बडगा नही देखा.' सगळे पळण्याचा मार्ग शोधू लागले. त्यात कोणीतरी पैशाची गडबड केली होतीच. तरी पण महादेवने सर्व जबाबदारी स्वत:वर घेतली. ओळखीचे अनेक गुजराती उद्योगपती सल्ला देत होते की कंपनीचे दिवाळे जाहीर कर व मोकळा हो, पण महादेवने ते केले नाही. (गेली दोन वर्षे भारतात एक प्रसिध्द (सु की कु) विमान कंपनीचे दिवाळे प्रकरण चालू आहे पण मूळ मुख्य मालक मात्र अर्धनग्न तरुणींची कॅलेंडरे बनवण्यात मग्न आहे हे दररोज आपण वाचतोच आहोत.) ह्या वेळेस नियती हसली नाही तर उलट तिने महादेवला धीर दिला व सांगितले की ''महादेवा तू भिक्षूक नाहीस, तू फिनिक्स पक्षी आहेस. ह्या अंग जाळणाऱ्या राखेतूनच तुला आकाशात भरारी मारायची आहे. तू विमान आहेस आणि हे विमान फिरते अधांतरी आणि ते ही आकाशात.''

महादेवने सर्व प्रकरण निस्तरले. नंतर आपल्या एका स्विस मित्राच्या सहाय्याने द्रव पदार्थ (उदा. फळांचे रस) कागदी खोक्यात भरण्याचा कारखाना चालू केला व निर्यातही करू लागला. आपले उद्योग तो फैलावू लागला. शंतनुराव किर्लोस्कर, एच. एम.टी.चे पाटील, कमांडर नानावटी, अनेक गुजराती व पंजाबी व्यापारी तसेच विंदा करंदीकर, श्री. ना. पेंडसे, पु.ल.देशपांडे ह्यांच्या सारखी मोठी माणसे शुभचिंतक म्हणून पाठीमागे होतीच. घड्याळे, बेअरींग, इंजिनिअरींगचे अनेक भाग, इ. व्यवसाय त्याने वाढवले. हाताखालच्या कामगारांपासून सर्वांना स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय करायला उत्तेजन दिले. ह्या बाबत रुईयाशेट व गोवर्धनभाई हा त्याचा आदर्श. अनेकांना शिक्षणात मदत केली. आपल्याला मदत करणाऱ्या बहिणीच्या मुलीला त्याने डॉक्टर केले व मुलाला इंजिनियर करून जर्मनीला पाठवले. काळे सर ज्या धनिकांकडून पैसे घेऊन विद्यार्थ्यांना मदत करत त्या धनिकांत महादेव नक्कीच असणार, हा माझा अंदाज. कारण हे धनिक स्वत:चे नाव जाहीर करत नसत.

शंतनुराव किर्लोस्कर म्हणजे आम्हा मेकॅनिकल इंजिनिअर लोकांचे 'महागुरू'. खरे तर महादेवाचे डिझेल इंजिन किर्लोस्करांच्या डिझेल इंजिनच्या आधी बनायचे पण तो योग नव्हता. पण भारतात शहरीकरण, बदलते हवामान व जंगलतोड ह्यामुळे मोठी पाणी टंचाई होणार आहे व त्यावर उपाय म्हणून भूजल वापरावेच लागणार हे वेळीच ओळखून त्याने भारतातला पहिला सबमर्सिबल पंप बनवला व तोही किर्लोस्करांनी सबमर्सिबल पंप करण्याचे आधी. मुरूडच्या ह्या भिक्षुकाने इंजिनियर नसताना शंतनुरावांना हरवले असे की शंतनुरावांची शाबासकीची थाप महादेवाच्या पाठीवर सदैव राहिली. २०२५ सालानंतर भारतात पाण्याची हलाखीची स्थिती निर्माण होणार असा एक अंदाज आहे. ते टाळायचे असेल तर आपण प्रत्येकाने पाण्याचा शक्य तो प्रत्येक थेंब वाचवला पाहिजे व प्रत्येक इमारतीचे 'रेन वॉटर हार्वेस्टींग' केले पाहिजे. तरच ती नेहमी आकाशात अधांतरी फिरणाऱ्या व आता आकाशातच रहायला गेलेल्या महादेवभटाला आपली श्रध्दांजली ठरेल.

**-सुरेश (रा.त्रिं.) बर्वे**


जगाच्या पाठीवर कुठेही जा, मात्र

**ट्रॅव्हल इन्शुरन्स पॉलिसी**

आमच्याकडूनच घ्या



- वय वर्षे ९९ पर्यंत वैद्यकीय चाचणीची आवश्यकता नाही.
- पॉलिसी ५०,००० डॉलर्सपासून ५ लाख डॉलर्सपर्यंत उपलब्ध.
- आम्ही कोणत्याही इन्शुरन्स कंपनीची पॉलिसी देतो.
- प्रिमियमचे दर अत्यंत माफक
- पॉलिसीची संपूर्ण माहिती, त्याची संपूर्ण सेवा त्वरित देण्याची व्यवस्था करतो.
- आपला काही क्लेम असेल तर आपल्याला संपूर्ण मार्गदर्शन करुन आपली नुकसानभरपाई मिळेपर्यंत सेवा.

**श्री. अनंत पु. गोखले**
भ्रमणध्वनी : 9869526152
दूरध्वनी : 26832233

इ–२/७०३, विजयनगर सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.
email: anant2611@yahoo.co.in

# नातीगोती

## नभ उतरू आलं

**-गणेश आचवल**

यंदाच्या वर्षी एकंदरीतच ऋतुचक्र बदलत चालले आहे. फेब्रुवारी महिन्यात सुद्धा अवकाळी पाऊस आला आणि आंब्यांच्या पिकांचे खूप नुकसान झाले. मग प्रचंड उन्हाळा सुरू झाला. उन्हाळ्याने तर महाराष्ट्रात अनेकांचे बळी घेतले. ७ जून म्हणजे पाऊस असे समीकरण झालेले असते. पण यंदा हा पाऊस १२ जून नंतर कोसळू लागला आणि जवळ जवळ आठवडाभर पावसाची संतत धार सुरूच होती. १८ आणि १९ जूनला तर पावसाने सगळे काही ठप्प केले होते. हार्बर लाईन बंद, मध्य रेल्वे बंद आणि पश्चिम रेल्वे सुद्धा ठप्प झाली. पंधरा दिवसांचा पाऊस दोन दिवसात पडला अशा बातम्या वर्तमानपत्रात आल्या होत्या. २६ जुलै २००५ ची पुनरावृत्ती होणार नाही ना अशी भीती वाटू लागली होती. प्रसार माध्यमे तर 'पाण्याच्या निचरा कां होत नाही" यावर चर्चासत्रं आयोजित करत होती आणि त्यात सहभागी झालेले राजकारणी एकमेकांना दोष देत होते. या सगळ्यावरूनच एकंदरीत पाऊस या विषयावरच लिहावेसे वाटले. खरे तर या पावसाशी प्रत्येकाचे नाते वेगवेगळे असते. लहान मुलांना हा पाऊस तर जिवाभावाचा सखा वाटतो.

**दोस्त आपुला पाऊस आला उघडा खिडक्या दारे**
**थेंब होऊनी मुठीत आले आभाळातील तारे,**

किंवा **येरे येरे पावसा, रुसलास का?** असे बालगीत गाणारी मुले डोळ्यासमोर येऊ लागली. मुसळधार पावसाची या बालदोस्तांना मुळीच पर्वा नसते. मोकळेपणे ही मुले पावसाचा आनंद घेतात. पाण्यात उड्या मारतात, होड्या सोडतात, भरपूर पावसात भिजावे, शाळेला सुट्टी मिळावी असे या लहान मुलांना वाटत असते.


पाऊस आणि कॉलेजचे विद्यार्थी यांचे नातेसुद्धा खूप काही सांगून जाणारे. हा पाऊस कॉलेजच्या परिसरात जेव्हा कोसळू लागतो तेव्हा या पावसातही चिंब भिजणे एक वेगळाच आनंद देणारे ठरते. कॉलेज सुरू झाले की वेगवेगळे उपक्रम सुरू झालेले असतात. मग कॉलेजच्या मराठी मंडळाचा कार्यक्रम सुरू होतो. त्यात पाऊसगाणी सादर केली जातात. अनेकदा कॉलेजची मुले मुक्त पावसात आनंद घ्यायला वरळी सी फेस, मरीन ड्राईव्हला जातात. तर कोणी एखाद्या गडावर ट्रेकला जातात. काही मंडळी जेव्हा विविध ठिकाणी पावसाळी सहलीला जातात तेव्हा तिथे एक वेगळेच भयंकर दृश्य पाहायला मिळते. काही वर्षापूर्वी लोणावळा येथे भुशी धरण येथे सहलीला गेलो होतो, प्रचंड पाऊस होतो, वाऱ्याचा जोर होता आणि तिथे जमलेल्या इतर काही गटातील मंडळी दारू पिऊन असभ्य वर्तन करत होती. कोणावर तरी कॉमेंट्स करत होती. आम्ही लगेचच तेथून निघालो. वाटेतसुद्धा प्रचंड कचरा दृष्टीस पडला. मनात विचार आले की, अशा रीतीने आपण त्या पर्यटन स्थळांना कां बिघडवत चाललो आहोत? असे असभ्य वर्तन करणारी माणसे जेव्हा दिसतात, तेव्हा त्यांच्यावर कारवाई कां केली जात नाही? तिथे पोलिस पहारा कां नाही? एक ना दोन, अनेक प्रश्न मनाला त्रास देत होते.

मला अजूनही २६ जुलै २००५ चा दिवस आठवतो. त्या दिवशी काही कामानिमित्त मी सी एस टी इथे होतो. पावसाचा जोर वाढल्यावर लगेच घरी आलो आणि बघता बघता मुंबईतला महापूर वाढत गेला होता. सर्व ठप्प झाले होते. अनेक ठिकाणची वीज गेली होती. रात्री मला आकाशवाणीतून फोन आला. जो आर.जे. त्या दिवशी कार्यक्रम करणार होता, तो येऊ शकणार नव्हता. मी नाना चौक येथे राहत असल्याने आमच्या अधिकाऱ्यांनी मला कार्यक्रम सादर करायला बोलावले. २७ जुलैला पहाटे पाच वाजताचा मराठी रेडिओ कार्यक्रम होता आणि त्या वेळी आर जे म्हणून माझी खरी कसोटी सुरू झाली. कारण दक्षिण मुंबईत जरी पाणी साचले नसले तरी उपनगरात प्रचंड पाणी होते आणि ते ओसरण्याची चिन्हे दिसत नव्हती. अशा वेळी अनेक लोक वाटेतच अडकले होते. त्यामुळे रेडीओवर हेल्प लाईन सुरू झाली होती. जे मेसेज आम्हाला मिळत होते, ते काळजाचा ठोका वाढवणारे होते. कोणाचे मूल शाळेतून परतले नव्हते तर कोणाची आई स्टेशनवर थांबून होती आणि तिचे दीड वर्षाचे बाळ घरी होते. त्यामुळे तिचा जीव कासावीस झाला होता. अशा वेळी एकीकडे तो मेसेज कार्यक्रमात सांगायचा आणि लोकांना आधार द्यायचा ही खूप मोठी परीक्षा होती आणि कार्यक्रमात गाणीसुद्धा ऐकवायची होती. मग पावसाची रौद्र रुपे दाखवणारी गाणी ऐकवली होती. माझा तीन तासाचा कार्यक्रम संपला आणि मग कळले की पुढचा आर.जे. पण येऊ शकणार नाही, त्यामुळे मलाच स्टुडिओ मध्ये थांबून कार्यक्रम करणे भाग होते. त्या दिवशी मी आणि माझ्या आणखी काही आर.जे.मित्रांनी सलग १८ तास कार्यक्रम सादर केले होते. सगळी उपाहारगृहे बंद होती. तेव्हा रेडिओच्या माध्यमातून परिचयाच्या झालेल्या एका मावशींनी आम्हा सर्वांसाठी खिचडी आणि चहा करून आणला होता. अखेर २७ जुलैला संध्याकाळी हळूहळू पाऊस विश्रांती घेऊ लागला.

या पावसाच्या संदर्भात एक गोष्ट आहे. त्याला बिचाऱ्याला कधीच कोणी चांगले म्हणत नाही. म्हणजे जेव्हा तो बरसत नाही, तेव्हा तो कधी येणार? असे म्हणून आम्ही नावे ठेवतो आणि कोसळू लागला तर कधी हा थांबणार? असे आपण म्हणतो.

पावसाची विविध रुपे सांगताना चित्रपटातील पाऊससुद्धा आठवू लागतो. जैत रे जैत मधील **नभ उतरू आलं** हे गीत, किंवा सर्जा चित्रपटातील, **चिंब पावसानं रान झालं आबादानी**, हे गीत आठवू लागले. **नभ मेघांनी आक्रमिले**सारखे नाट्यगीत आठवले किंवा **घोडे जैसी चाल, हाथी जैसी दूम** हे गाणे सुद्धा आठवले. कुसुमाग्रजांनी **कणा** ही पूरग्रस्तांना सकारात्मक दृष्टीकोन देणारी कविता आठवली.

**तिच्यासोबत पावसात कधी भिजला असाल जोडीनं। एक चॉकलेट अर्ध अर्ध खाल्लं असेल गोडीनं।।** या मंगेश पाडगावकर यांच्या ओळी आठवल्या.



एकंदरीत हा पाऊस आपल्या जीवनाशी नाते जोडतो हे नक्की.

**-गणेश आचवल**
9833268391
athatharvbharadwaj@gmail.com

# व्यक्ती परिचय

## कुटुंब रंगलंय काव्यात....

मागील तब्बल ३४ वर्षांपासून भारतासह जगभरात मराठी काव्याचा अन् मराठी भाषेचा प्रचार-प्रसार करण्यासाठी कवितांचे कार्यक्रम करणाऱ्या विसुभाऊ बापट यांच्या 'कुटुंब रंगलंय काव्यात' या कार्यक्रमाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विसुभाऊंच्या या एकपात्री कार्यक्रमाची नोंद वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडियानेही घेतली असून १२ जून रोजी त्यांना या संदर्भातील मेमेन्टो आणि प्रशस्तिपत्र पाठवून त्यांच्या गौरव केला आहे.

कुटुंब रंगलंय चे जगभरात आत्तापर्यंत २०,७१० प्रयोग झाले आहेत. सलग ४५ तास मराठी कवितांचा एकपात्री प्रयोग करण्यात विसुभाऊंचा हातखंडा आहे. प्रस्थापितांच्या अपरिचित कविता आणि अपरिचित कवींच्या अप्रतिम कविता विसुभाऊ त्यांच्या कार्यक्रमात सादर करतात.

२६ जानेवारी १९८१ मध्ये अहमदनगर येथून त्यांनी त्यांच्या या काव्यमैफिलीला सुरुवात केली होती. यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. मराठी भाषेचा वारसा, मराठी कवितांचा वसा जपत जगभरात विसुभाऊंची मैफल चांगलीच रंगते आहे.



WORLD AMAZING RECORDS
http://www.worldamazingrecords.com
WORLD RECORDS INDIA
http://www.worldrecordsindia.com

CERTIFICATE


Longest Running Poetry Recital

VISHWANATH SHRIDHAR BAPAT
KNOW AS VISUBHAU BAPAT,
ARTIST OF ONE ACT
MUMBAI, MAHARASHTRA,
PERFORMED AND RECITAL
ONE ACT PLAY
FOR NONSTOP 15 HRS
WITH OUT REPETITION
THE CONTAINT
IN
KUTUMB RANGALAY KAVAYAT.
HE PERFORMED
MORE THAN 2700 TIMES
BETWEEN 1981 TO 2015
AT VARIOUS PLACE

Pavan Solanki
Founder - President
World Records India

**प्रा. विसुभाऊ बापट**





BOOK OF RECORDS Limca 2001
INDIA AT HER BEST

Limca book of Records Page 82.

**Longest-running poetry recital**
Vishwanath Shridhar more popularly known as Visubhau Bapat is a one-act player of a programme Kutumb Rangalay Kawyat. It is a recital of unknown and classic poems penned by well-known Marathi poets. Since January 26, 1981, he has been performing this one-act play on Marathi Rangabhoomi at different venues, starting at the Nagar Club in Ahmednagar, Maharashtra. 2005 was the silver jubilee year of Kutumb Rangaly Kawyat.

### आचार्य अत्रे जयंती निमित्त विडंबन कविता स्पर्धा

कुटुंब रंगलंय काव्यात च्या कुटुंब कविता या व्हॉटस् अॅप ग्रुप च्या वतीने आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या जयंतीनिमित्त विडंबन कविता लेखन स्पर्धा आयोजित केली आहे.

ही स्पर्धा राज्यातील व देश-विदेशातील सर्वांसाठी खुली व विनामूल्य असून कवींनी आपली विडंबन कविता मूळ कविच्या कविता गीतासह प्रा. विसुभाऊ बापट, १०२, श्री साई प्रभादेवी को.ऑ.हा.सो., उमाविश्व, आगार बाजार, काशिनाथ धुरु मार्ग, दादर (फ), मुंबई ४०० ०२८ येथे दिनांक २५ जुलै २०१५ पूर्वी पाठवावी.

दि. १३ ऑगस्ट २०१५ रोजी होणाऱ्या विशेष कविसंमेलनाच्या कार्यक्रमात स्पर्धेची पारितोषिके वितरित होतील. त्यात प्रथम क्रमांक रु. ५०००, द्वितिय क्रमांक रु. ३००० , तृतीय क्रमांक रु. २००० आणि उत्तेजनार्थ रु. १००० अशी बक्षिसे देण्यात येतील. विसुभाऊ बापट भ्रमणध्वनी क्रमांक ९९२०३४६७८ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन शिवाजी गावडे व कमलाकर राऊत यांनी केले आहे.

### कथापूर्ती

**कथापूर्तीचा प्रयत्न काही वाचक-लेखकांनी केला होता. परंतु ती न रुचल्यामुळे प्रसिद्धी दिली नाही. क्षमस्व. मात्र ज्या वाचक-लेखकांनी प्रयत्न केला त्यांचे अभिनंदन.**

### सूत्रधार मनोरंजक कार्यक्रम सूची २०१५

**सूत्रधार मनोरंजक कार्यक्रम सूची २०१५ चे प्रकाशन झाले असून वर्षभरात ज्या संस्था वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करतात अशा संस्थांना ही सूची विनामूल्य दिली जाते. मात्र अशा संस्थांनी (ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळे, गणेशोत्सव मंडळे, नवरात्रौत्सव मंडळे, रोटरी क्लब, इनरव्हील क्लब) विनंतीपत्र देणे आवश्यक आहे.**

**ही सूची महाराष्ट्रातील नामवंत पुस्तकांच्या दुकानांतदेखील विनामूल्य उपलब्ध आहे. मात्र विनंतीपत्र देणे गरजेचे आहे. एवढेच नव्हे तर www.bookganga.com वर देखील पाहू शकाल.**

**ही सूची घरपोच हवी असल्यास मात्र पोस्टाचा टपालखर्च वा कुरिअर चार्जेस द्यावे लागतील.**

**ह्या सूचीत एकपात्री, द्विपात्री, बहुपात्री, सांगीतिक, नकलाकार, शब्दभ्रमकार, काव्यसादरकर्ते, व्याख्याते, कथाकथनकार, नृत्यांगना, शैक्षणिक कार्यक्रम करणाऱ्या कलाकारांचे संपर्क दिलेले आहेत. सूची घरपोच मागवण्यासाठी :**

**सूत्रधार: स्वाती अनिल हर्डीकर, ४७, नरसिंगाश्रम, पारले टिळक विद्यालयासमोर, हनुमान रोड, मुंबई ४०० ०५७.**

**अधिक माहितीसाठी संपर्क- ९८१९३४०१४६**

# कथा वास्तवातली

## काही काम आहे ?

- डॉ. अशोक कोर्डे

कुणी दीनवाणीने, अजिजीने माझ्याशी बोलू लागलं की मी बऱ्यापैकी विरघळतो. मला झिडकारता येतच नाही. त्या अजिजीमध्ये एक संधिसाधूपणा असतोही. 'बापुडा चेहरा न् वाणीला तोतरा' अशा माणसाशी संबंध ठेवायचा नाही हे मी ठरवतो. पण मला ते जमत नाही आणि नंतर मी पस्तावतो. न् अर्थातच स्वकीयांकडून टीकेचे शर-संधान सहन करावे लागते.

तो भेटण्यास आला होता तो दिवस होता गुढीपाडव्याचा. तसाच विनम्र भाव, डोळ्यात व्याकूळता, स्वर केविलवाणा, सर्व शरीरच लीनतेने लपेटलेले होते. मळकी पॅन्ट, इस्त्री केलेला पण मळकट बुशशर्ट, पायात रबरी चप्पल, खुरटी दाढी, कृष्ण रंग, केस विस्कटलेले न् कपाळावर गुलाल. दवाखान्यात आला अन् मला म्हणाला ''काही काम आहे? मला नोकरी पाहिजे. पगार तुम्ही द्याल तो, पण मला काम द्या'' तीस-पस्तीस वयाच्या तरुणाकडून ही अनपेक्षित मागणी मला अचंबित करून गेली. मदतीसाठी पैसे मागणारे येतातच. तसाच तो वाटत होता. पण काम करून पैसे मागत होता. म्हणजे त्याची कष्टाची तयारी होती. नुसतीच दया-भीक नको होती. मी त्याला म्हटलं, ''काय शिकलायेस? काम काय करशील? '' तशी तो म्हणाला, ''सातवीपर्यंत आईनं शिकवलं, पण कोणतंही काम द्या, मी करेन'' माझ्या मित्राला त्याच्या ऑफिससाठी 'ऑफिसबॉय' पाहिजे होता म्हणून लगेच त्याला फोन लावला....तर त्याने सांगितले, ''एकाला आजपासूनच ठेवले आहे'' त्याने ते ऐकलं. तो खिन्नपणे म्हणाला, ''पाहिलं? माझं नशीबच फुटकं आहे. नशीबानं मला कधी साथ दिलेली नाही. मग मला टेन्शन येतं, माझ्या हातून चूका होतात, गफलती होतात...आणि मला कामावरून काढून टाकतात'' त्याचं नशीबच फुटकं ह्याचा अनुभव लगेच आला होता. त्याचा प्रामाणिकपणा व कामाची निकड ह्या गोष्टीवर मी विश्वास ठेवून त्याला म्हणालो, ''तुला आत्ताच एक काम सांगतो, बघू तू करतोस कां? मग मी तुला कामावर ठेवायचे की नाही ते सांगतो''. त्याला मी पाच रुपये दिले न एक स्टँप आणायला सांगितला. पोस्ट ऑफिसला कसे जायचे ते सांगितले. अर्धा-पाऊण तासाने तो घामाघूम होत हजर झाला. त्याने दिलेला स्टँप घेत मी विचारले ''कारे इतका वेळ का लागला?'', तो म्हणाला, ''मला पोस्ट सापडलं नाही'', ''मग स्टँप कोठून आणलास?'' माझ्या ह्या प्रश्नाला त्याने स्पष्टिकरण दिले. ''मी स्टँप पानाच्या गादीवरून आणला. माझ्याकडचा एक रुपया देऊन, पाच रुपयाचा स्टँप सहा रुपयाला आणला. तुमचे पहिलेच काम नाही झाले तर तुम्ही चिडाल, नोकरीवर ठेवणार नाही'' काम न झाल्याने नोकरी जाईल ह्या पोटी त्याने केलेला प्रयत्न स्तुत्यच होता. पण दुसऱ्याच गल्लीतलं पोस्ट-ऑफिस सापडू नये हे पण मला खटकलं. त्याचा रुपया त्याला देत म्हटलं, ''हे बघ, मला सध्या तरी काम करण्यासाठी माणसाची जरूर नाही. पण जसं काम असेन तसं ते सांगेन. त्याचे पैसे देईन, पगार मिळणार नाही.'' तो म्हणाला, ''चालेल, मला काम द्या, पैसे तुम्हाला वाटतील तेवढेच द्या.''

त्याला त्याचे नाव, पत्ता विचारू लागलो. तशी त्याने खिशातून कार्ड काढलं. एका सार्वजनिक-सामाजिक संस्थेने नागरिकांसाठी केलेले ओळखपत्र होतं ते. त्यावर त्याचं नाव, पत्ता, परिचितांची नावे, रक्तगट, आरोग्यविषयक जुजबी माहिती, इतकंच काय पण शरीरावरची जन्मखूण पण नोंदवलेली होती. आपत्कालीन परिस्थिती आल्यास परिचितांची नांवे व दूरध्वनी पण त्यावर लिहिलेला होता. मी त्याला त्या ओळखपत्राची झेराक्स आणून देण्यास सांगितले. त्याला म्हणालो, ''हे बघ विक्रम, तू उद्यापासून तू सकाळ-संध्याकाळ दवाखान्यात ये, काही काम असेल ते तू करायचं. पैसे देईन, पण पगार मिळणार नाही, हे मात्र लक्षात ठेव.'' ''चालेल'' म्हणत तो गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो आला, ''काही काम आहे?'' म्हणत तो उभा राहिला....आणि मग ते रुटीन झालं. सकाळ-संध्याकाळ ''काही काम आहे?'' चा प्रश्नांकित चेहरा दर्शन देवू लागला. आपली सटर-फटर कामं निघतातंच. ती मी सांगू लागलो. पण काही दिवसातच मला तो पटेनासा झाला. कारण, प्रत्येक कामात चुका....समजावून सांगता सांगता वैताग यायचा. ओरडलं तर ''माझं नशीबंच फुटकं,मी मनापासून करायला गेलो तरी चुकतोच'', म्हणत ''सॉरी, सॉरी'' ची जपमाळ ओढायचा. झेरॉक्स करायचे पेपर्स दिले की, उलट-सुलट झेरॉक्स करून आणायचा. एका महिला पेशंटला बसने अंधेरीला जाणाऱ्या बसस्टॉपवर सोडायला सांगितले तर ह्या पठ्याने शिवडीच्या बसस्टॉपवरून बसमध्ये चढवून दिले. त्या बाईने मला असं प्रेमानं (!) झापलं की मला फोन केव्हा एकदाचा ठेवतो असं झालं. सर्व कामं सांगता सांगता वेळ पण जायचा. परत घोळ होणं हे अपरिहार्यच ठरायचं. पेशंटचे बील दुसऱ्याच कोणा इसमाला दिल्यामुळे मला फिट येण्याचंच बाकी ठेवलं होतं. परत ''नशीबच फुटकं''च पालपुद असं म्हणायचा की कीवच यावी!

फक्त अत्यंत प्रामाणिक होता म्हणून आणि फुटकळ कामे विनासायास होतात म्हणून त्याला ठेवला होता. मित्र मला ''तुझा हनुमान आला'' असेच म्हणायचे. कामात घोळ घालायचा म्हणून मी त्याला महत्वाची व पैशाची कामे सांगायचे बंद केले. मी ओरडेन ही त्याची भीती अनाठायी नव्हती....कारण मी त्याला झापायचो. त्या दिवशी कहर झाला. बँकेत चेक टाकायला पाठविले तर दुसऱ्या बँकेत चेक भरायला गेला. रात्री तो सॉरी म्हणायला आला. मी जाम उखडलो, अन् ''उद्यापासून येवू नकोस'' म्हणून बजावले. तो दीनवाणीने क्षमायाचना करू लागला, नशीबाला दोष देऊ लागला.

तेवढ्यात फोन वाजला. त्याला गप्प करीत फोन उचलला. समोरून मुलुंडच्या एका पेशंटने बोलायला सुरूवात केली. दादरहून

मुलुंडला स्थायिक झालेला हा पेशंट ‘फॅमिली डॉक्टर’ ह्या संकल्पनेवर विश्वास ठेवून असल्याने बऱ्याच वेळ फोन करत असे. आत्ता फोनवर सांगत असलेली बातमी व माहिती धक्कादायक होती. त्यांच्या सुनेला रक्ताचा कर्करोग झाला होता. त्याबद्दल बोलून झाल्यावर त्यांनी सांगितले की, तिला उद्याच्या उद्या तीन बाटल्या रक्त द्यायचे आहे. पण सुनेचा रक्तगट दुर्मिळ आहे असं इकडचे डॉक्टर म्हणताहेत. त्यांना शांत करत मी विचारले, ‘‘कोणता रक्तगट आहे तिचा?’’ त्यांनी सांगितले, ‘‘फारच रेअर आहे, एबी निगेटिव्ह’’ ‘‘अरे बापरे,’’ मी सहजपणे म्हणालो. ‘‘म्हणून तर आम्ही हबकलो आहोत. आमचे तर येथे कुणीच ओळखीचे नाही, तुमच्याकडे आहे का कुणी एबी निगेटिव्ह?’’ त्याने असहाय्यपणे विचारले. मी त्याला आश्वस्त करत म्हणालो, ‘‘ब्लड तर द्यावं लागेल, मी बघतो कुणी सापडतंय कां...पण पाठवू कुठं त्या माणसाला ब्लड डोनेशनला?’’ मग त्यांनी पत्ता सांगायला सुरूवात केली. टेबलावर नेमका कागद पेन सापडेना. मी शोधाशोध करताना विक्रमने पेन काढलं, न् हातावर लिहून घेऊ लागला. मी फोनवरून ते सांगत असलेला पत्ता, फोन नंबर वगैरे समोर उभा असलेल्या विक्रमला सांगितला. फोन बंद झाल्यावर एका कागदावर पत्ता, फोन नंबर वगैरे सर्व नीट लिहून घेतलं. त्याला जायला सांगितलं न त्याला त्याचे राहलेले पैसे नेण्यास सांगून ‘‘उद्यापासून येऊ नकोस’’ सांगितले.

तो निघून गेल्यावर माझी ब्लडडोनरची यादी काढली. दोन-चार फोन केले. एकाने दोन महिन्यापूर्वीच रक्त दिले होते, दुसरा मलेरियातून नुकताच बरा झाला होता, तिसरा तर चक्क फॉरेनलाच गेला होता. एबी निगेटिव्ह हा रेअरेस्ट ग्रुप असल्याने काम मोठं अवघडच होतं. ‘उद्या सकाळीच बघू या’ चा विचार करत मी दवाखाना बंद केला, घरी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी, कालच्या त्या बातमीचा पगडा कमी झाला होता. कुठूनही रक्तदाता मिळत नव्हता. मी माझ्या दवाखान्याच्या कामात गुरफटलो. दुपारी दोन वाजता त्या पेशंटचा मुलुंडहून फोन आला, तसा मी ओशाळलो. आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्याच्या आपण उपयोगी पडलो नाही, ह्याची खंत वाटली. मी फोन उचलला. दुसऱ्या बाजूने आवाज आला, ‘‘हॅलो डॉक्टर... तुमचे आभार कसे मानू तेच कळत नाही. एका फोनसरशी तुम्ही आमचे काम केलेत. तीन बाटल्या रक्त द्यायचे होते, दोन बाटल्यांची सोय आम्ही केली. एक डोनर रात्रभर प्रयत्न करून मिळेना म्हणून फार विवंचनेत आम्ही होतो, तुम्ही पाठविलेल्या माणसाने रक्त दिले, आमची सोय झाली, खरंच थँक्स डॉक्टर, मनापासून बोलतोय मी .’’ मी त्याला थांबवत बोललो, ‘‘अहो पण कोण येवून गेला तुमच्याकडे?, मी तर कोणालाच पाठवलेलं नव्हतं तुमच्याकडे.’’ ‘‘अहो डॉक्टर, असं काय करताय? तुमचाच माणूस आला होता... त्यानंच एक बाटली रक्त दिलं, विक्रम नावाचा होता कुणीतरी... त्याला धन्यवाद द्या...’’ मी अवाक झालो.

मी ड्रॉवर उघडला, विक्रमच्या ओळखपत्राची झेरॉक्स पाहिली. सर्व माहितीत रक्तगट पण लिहिलेला होता. एबी निगेटिव्ह.

सतत चुकणारा, नशीब आड येणारा विक्रम संध्याकाळी दवाखान्यात येईल, अन् विचारेल ‘काही काम आहे?’

काय उत्तर देवू त्याला?..



**डॉ. अशोक कोर्डे**
**9820435204**

## विद्यार्थ्यांसाठी

**ब्राह्मण सेवा मंडळातर्फे ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येते. ४थी, ७वी शिष्यवृत्ती १०वी, १२वी, पदवी व पदविका तसेच इतर परिक्षेत उत्तम गुण संपादन केलेल्या सर्वांनी गुणपत्रिके - सोबत अर्ज करावा.**

**तसेच, जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व ज्यांना आर्थिक मदतीची गरज आहे अशा सर्वांनी मंडळात अर्ज करावा.**

**दोन्ही अर्ज मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.**




लेखकांची सदरे...



को व ळी   उ न्हे



घ ट का   गे ली
प ळे   गे ली



म नो भा वे



सो   कु ल



श न्ना   डे



पिं प ळ पा न



मो र पं खी



प हि ला   च हा



न व्या   दि शे चा   शो ध

**-मंजिरी वैद्य**

**जाहीर माफी**

श्री. जयवंत दळवी ह्यांच्या सदराच्या नावासाठी कमी चौकोन दिल्यामुळे वाचकांचा गोंधळ झाल्याबद्दल क्षमा असावी.

# व्हॅ'नीला'

## मुंबई २६ जुलै...

-नीला वैशंपायन

चाळीच्या अंगणात अनेक बाळकरामांच्या धिंगाण्याने, अंगणात फुललेल्या फुलांनी, त्या झाडावर विहरणाऱ्या असंख्य पाखरांच्या चिवचिवाटाने माझं मन तृप्त होत असे. तेव्हा माझं जग गिरगाव ते दादर एवढंच होतं. अनेक छोट्या छोट्या चाळीत राहणारी जिव्हाळ्याची माणसं हेच माझं वैभव होतं. क्वचित भांडणतंटे झाले तरी माणसं खूप प्रेमाने, आपुलकीने राहत होती. अंगणात एखादीच चार चाकी, टीव्हीची एखादीच ॲन्टेना फडकत असे. बाहेरगावी गेलेल्या, शेजारच्या घरी आलेला पाहुणा सुद्धा चहा शिवाय परत जात नसे. समोरून पाहिलं तर वेगळी दिसणारी घरं आतून मधल्या दाराने जोडलेली होती. हळूहळू चाळी पडल्या. बंद दारं-खिडक्यांच्या टोलेजंग इमारती उभ्या राहिल्या. मुलांना बागडायला मोकळी मैदानं नाहीत, पाखरांना विहरायला झाडं नाहीत. आपल्या अंगाखांद्यावरचे दागिनेच काय, माझी भरजरी वस्त्रं कुणीतरी ओरबाडल्यागत दु:ख होत होतं मला. पण सुबत्तेच्या काविळीत कुणालाच माझं क्रंदन कळत नव्हतं. घरात काकू-मावशीने शिवलेल्या फाटक्या चादरींच्या नेटक्या पिशव्यांची या माझ्या लेकरांना लाज वाटू लागली. प्लास्टिक आलं. प्रत्येक भाजीवाला, फुलवालासुद्धा सामानाबरोबर प्लास्टिक पिशवी देऊ लागला. मधल्या वेळच्या ताज्या खाऊची जागा चकचकीत कागदातल्या खाऊने घेतली. पूर्वी चाळीच्या मजल्यावर कचरा टाकण्याच्या एक किंवा फार तर दोन जागा होत्या. आता प्रत्येक घरात एक डबा ओसंडून वाहू लागला आणि तेवढाच रस्त्यावर सुद्धा वाढला. एकेकाळी महापालिकेचे कर्मचारी सगळे रस्ते घर असल्याप्रमाणे स्वच्छ धुवून काढत. घरात कपाट भरली तर सामान कसं इथे तिथे पडलेलं दिसतं तसं कचरा एकत्र ठेवण्याच्या जागा ओसंडून वाहिल्यामुळे सततचा कचरा सगळीकडे पडू लागला. त्याची कुणाला खंत नाही की लाज नाही. तो समुद्र, माझा सखा सगळं गिळंकृत करत होता, सगळं सामावून घेत होता. क्वचित कधीतरी ओहोटी लागल्यावर आपण काय काय सामावून घेतोय ह्याचं दर्शन घडवत होता, पण कुणीच त्याच्याकडे लक्ष देत नव्हतं.

सगळेच जण आपली वेळ गाठण्यात मग्न झाली. बाजूला कोण आहे? काय करतंय? ह्याचं कोणालाच कसलंच सोयरं सुतक नाही. इथली लोकल म्हणजे मूर्तीमंत प्रतीक ह्या माणसांचं! बाजूला कुणी आजारी आहे, अभ्यास करतंय? कुणालाच कुणाची पर्वा नाही. प्रत्येक जण 'हम अपनी मस्ती में, आग लागे बस्ती में' अशा मिजाशीत वावरतोय. मी आणि माझं एवढंच जग! बाजुच्याचा विचार मी का करू? तो ज्याने त्याने आपापला करावा. इतका तटस्थपणा कसा आला इथल्या माणसांमध्ये? एकाच ठिकाणी, एकाच ठिकाणाहून जाण्यासाठी दोन माणसांनी एक वाहन वापरणे म्हणजे शुद्ध चिंधीगिरी!! कुणाला काही विचारण्याच्या भानगडीत पडायचं नाही हा सभ्यपणा प्रत्येकाच्यात भिनू लागला.

आणि तो दिवस उजाडला. प्रत्येकजण नेहमीप्रमाणे आपापलं कामाचं ठिकाण गाठत होता. सगळं कसं अगदी रोजच्यासारखं. नाही म्हणायला थोडं अंधारून आलं होतं. थोडा दमटपणा जाणवत होता. पण तसं तर तो या दिवसात नेहमीच असतो. पण दुपार टळली आणि......

प्रचंड जलवर्षावात मी न्हाऊन निघत होते. नंतर हा वर्षाव असह्य होऊ लागला. माझा सखाही खवळला होता. काहीच सामावून घेण्याच्या मनस्थितीत नव्हता तो. सगळ्या वाटांवर जणू नद्या अवतरू लागल्या. रस्त्यात वाहनांची रांग, रेल्वे ठप्प. पाणीच पाणी चहुकडे. काळनागिणी नदी वैरीण बनून घराघरात घुसत होती. घरातलं सामानसुमान, धान्य सगळं ओरबाडून सोबत नेत होती. माणसं, गुरंढोरंही त्यातून सुटत नव्हती. सगळीकडे पाणी, पण पिण्यासाठी थेंबही नाही अशी अवस्था होत होती. कार्यालयात अडकलेल्यांना घरच्या माणसांच्या काळजीने रडू फुटत होतं. शाळेत गेलेलं आपलं लेकरू कसं असेल? कुठे असेल? ह्या काळजीने जीव तुटत होता. ज्यांनी लागलीच कार्यालय सोडलं, ते वाटेत कुठे कुठे अडकत गेले. परिस्थितीचं भान यायला थोडा वेळ लागला, पण भान आल्यावर मग मात्र वेगवेगळ्या कार्यालयातून लोकांना कार्यालय न सोडण्याचे निर्देश दिले गेले. सगळ्यांच्या जेवणाची सोय केली गेली.

रस्त्यावर अडकलेली माणसं मिळेल ते वाहन पकडून आपला मुक्काम गाठण्याच्या प्रयत्नात होती. ओळख नाही, पाळख नाही तरी परिस्थितीचं भान प्रत्येकाला दुसऱ्याला मदत करायला उद्युक्त करत होतं. जागोजागी थांबलेल्या गाड्यांमध्ये प्रवासी अडकले होते. रेल्वे ट्रॅकवरच्या पाण्यात उतरणार कसं? त्यांना खाणे/पाणी पुरवण्यासाठी अनेक जण साखळीकरून निदान वडापाव तरी मिळावा याची काळजी घेत होते. रस्त्यावर अनेकजण घराघरातून बिस्किटांचे पुडे, पिण्याचे पाणी वाटसरूंना देत होते. वैष्णवदेवी/अमरनाथच्या वाटेवर जसे लंगर असतात तसेच जणू इथल्या सामान्य माणसांनी लावले होते. इथे अडकलेल्या प्रत्येकाला खरंतर एकमेकांच्या गरजा जाणून घेऊन जमेल ती मदत करण्यात जो तो धन्यता मानत होता. संदर्भ ते नव्हते , पण जणू..

वर्णअभिमान विसरली नाती ।  
एकाएकां लोटांगणी जाती ।  
निर्मळ चित्ते जाली नवनीते ।  
पाषाणा पाझर सुटती रे ।।

अशीच इथली गत झाली होती. प्रत्येक जण स्वयंस्फूर्तीने दुसऱ्याची सुद्धा काळजी घेत होता. प्रत्येक जण स्वत:चं वलय बाजूला ठेऊन आपला मान, पतप्रतिष्ठा विसरून गेला होता. असेलही यात कुणी राजकारणी, कुणी तारे-तारका, पण ते वलय ते स्वत:सुद्धा विसरले होते आणि समोरचा सुद्धा विसरला होता. सगळे अतिशय सामान्य झाले होते. एरव्ही कुणाला आपल्या घराचा दरवाजासुद्धा न उघडणारी ही माणसं आज एखाद्या अनोळखी माणसालासुद्धा त्याच्या मूलभूत गरजा कसलाही विचार न करता पुरवत होती. बसच्या टपावर बसून अंधारात रात्र काढणाऱ्या अनेकांना शेजारी आपण कुणाचा

हात धरलाय हे पण कळत नव्हतं. ''इथे जाऊ नका, त्या बाजूने या'' असं सांगणाऱ्या माणसांवर डोळे मिटून विश्वास ठेवत होती. 'शेजारचा पिंट्या शाळेतून आला नाहीये रे, त्याला जाऊन घेऊन ये ना' हे संवाद अनेक ठिकाणी ऐकू येत होते. एरवी दरवाजे बंद करणारे हात 'आई,बाबा येतील हं आता' असं म्हणत शेजारच्या पिंकीला थोपटत होते. रात्री तीन वाजता सुद्धा रस्त्यावरच्या मुलीला एकटेपणाची भीती वाटत नव्हती. कारण मुळात ती एकटी नव्हतीच. परमेश्वराचं अस्तित्व विसरल्यागत वागणारे सगळेच घरोघरी 'अतिथी देवो भव' या भावनेने घरी येणाऱ्या पाहुण्याच्या स्वागताला सज्ज होते.

अनेक संसार त्या दिवशी उध्वस्त झाले. कुणाचं जीवाभावाचं कुणी त्या ओघात वाहून गेलं. दोन चार दिवसानंतर हळू हळू पुन्हा सगळं पूर्वपदावर यायला सुरवात झाली. काही वृत्तपत्रांत 'मुंबई बुडाली', कुठे 'ढगफुटी', तर एका वृत्तपत्रात चक्क 'मुंबईवर जलात्कार' अशा मथळ्यांनी सत्यकथन केलं. जगभरात त्या दिवशीची ती मुख्य बातमी होती. या जलात्कारात माझ्या डोळ्यातलं पाणी एकरूप झालं होतं. जगाला हसवणाऱ्या चार्ली चॅप्लीनचं एक वाक्य आहे, 'मला पावसात चालायला आवडतं कारण पावसात माझ्या डोळ्यातलं पाणी कोणाला दिसत नाही'. त्या बिचाऱ्याच्या आयुष्यात एवढं अपार दु:ख होतं की, दोन्ही डोळ्यातून खारट पाण्याचे कढत थेंब ओघळत असतील. पण माझं मात्र तसं नाही.

माझ्या एका डोळ्यातले अश्रू हे 'काय अवस्था करून घेतल्येय स्वत:ची' ह्या दु:खाचे, संतापाचे होते. समुद्रात वाहून जाणारं पाणी अडवून ठेवणारा कचरा या माझ्या लेकरानीच केला होता. 'आतातरी उघडतील का यांचे डोळे?' या काळजीने माझा एक डोळा भरून येत होता.

पण दुसऱ्या डोळ्यातले अश्रू मात्र समाधानाचे होते. अजून इथला माणूस माणसाला, माणसातल्या परमेश्वराला विसरला नाहीये याची साक्ष आज मला मिळाली होती. नकाराची परिस्थिती उदभवली तर हातात हात घेऊन कोणतेही संकट परतवू शकतो या निर्धाराच्या कौतुकाचे होते, जणू माझी जुनी माणसं मला परत भेटली होती.

चार दिवसांनी सूर्याची कोवळी किरणं भेटायला आली. ती सुद्धा म्हणाली, 'सावरलीस?, झालं ते झालं, किती दु:ख करशील त्याचं?, लाग मार्गाला, तुला थांबून चालणार नाही'

आणि सुरू झाले मी पुन्हा नव्या जोमाने.. नव्या निर्धाराने........

दहा वर्ष झाली. सगळं विस्मृतीत गेल्यासारखं सगळी माणसं पुन्हा वागू लागली. ते प्रेम, माणुसकी, एकमेकांबद्दल वाटणारा जिव्हाळा फक्त विपरीत परिस्थितीतच दिसणार कां ? तसं असेल तर माझी माणसं विपरीत परिस्थितीला आमंत्रण तर देत नाहीत?



-नीला वैशंपायन
9920329214
wneela@gmail.com

नमस्कार.

आपल्या सर्वांना माहिती आहेच की ब्राह्मण सेवा मंडळ १०० वर्षे पूर्ण करीत आहे. या निमित्ताने ब्राह्मण समाजासाठी उपयोगी ठरतील असे महत्त्वाचे काही उपक्रम आम्ही सुरु करीत आहोत.

त्याचाच एक भाग म्हणून मुंबईतील जास्तीत जास्त ज्ञातीसंस्थांनी एकत्र येऊन काम करावे यासाठी २४ ऑक्टोबर २०१५ रोजी मंडळाच्या सभागृहात दादरमध्ये एक वधुवर मेळावा आयोजित करण्याचे ठरले आहे.

शतक महोत्सवाच्या संदर्भात अनेक संस्थांच्या प्रतिनिधींशी विचार विनिमय केल्यावर या विषयात एकत्रित काम करण्याची गरज आहे हे प्रकर्षाने जाणवले. ह्या हेतूने प्रेरित होऊन विवाह मेळाव्याचा उपक्रम आयोजित करण्यात येणार आहे. अत्यंत नाममात्र शुल्क घेऊन सर्व मराठी ब्राह्मण समाजातील उपवर वधुवरांसाठी हा मेळावा असेल. आपल्याला विनंती आहे की ही माहिती आपण आपल्या ओळखीच्या सर्व इच्छुकांपर्यंत पोहोचवावी.

यापुढे या संदर्भातील सर्व माहिती स्वयम् द्वारे आपल्यापर्यंत पोहोचविण्यात येईल.

इच्छुकांनी या उपक्रमाचा जरुर लाभ घ्यावा.

Airmate A Multibrand A.C.Showroom

S.S.Dealers | LG | VOLTAS LIMITED | HITACHI Inspire the Next | Panasonic | VIDEOCON | BLUE STAR | SAMSUNG | DAIKIN | Carrier

Service Range:
- Gift on every purchase
- Exchange old with new A.C.
- Immediate delivery & installation
- On Annual Maintenance Contract
- On rental basis
- Guaranteed repairs of Indian & Imported ACs

0% Finance

Showroom : Dattatray Niwas, Shop No. 3, 'B' Block, Opp. Portugese Church, S. K. Bole Road, Dadar(W), Mumbai 28
T: 24301910, 24313073, 24302993
M: 9820043019
E: alhadaircon@yahoo.co.in
W: alhadaircon.com

# काकपुराण

-सौ. विद्या पेठे

त्या दिवशी माझ्या खिडकीसमोरच्या झाडावर ८-१० कावळे जोरजोरात काव-काव करु लागले. मी त्यांना हाकलायला गेले तर चक्क माझ्या खिडकीवरच येऊन बसले आणि माझ्याशी बोलू लागले, ''काय! तुमच्या ज्येष्ठ नागरिक संघात 'कावळा' हा विषय दिला आहे म्हणे भाषणाला. शिवाय तुमच्या अध्यक्षीणबाई म्हणाल्या, ''अगदी सोप्पा विषय दिलाय हो, आहे काय त्यात बोलण्यासारखं!'' कावळे कावकावले म्हणजे बोलू लागले, ''काय इतका तुच्छ वाटतो का हा विषय तुम्हाला?'' मी माझी बाजू सावरायला म्हटलं, ''छे, हो! तुमचा काहीतरी गैरसमज झालाय. आमच्या संघात नेहमी चांगल्या विषयावरच बोललं जातं'' तेवढ्यात एक कावळा म्हणाला, ''तुमच्या सारख्या ज्येष्ठ नागरिकांना हे शोभत नाही'' ''काव काव काव, म्हणजे आम्ही तुमचा निषेध करीत आहोत.'' मी म्हटलं, ''अहो, असे रागावू नका, मी तुमची चांगली बाजू अवश्य मांडेन आमच्या ज्येष्ठ नागरिक संघात''. ''ती तर तुम्हाला मांडावीच लागेल पण आमच्या तुम्हा माणसांबद्दल काही तक्रारी आहेत तसंच तुम्हां बुद्धिमान माणसांनाही अज्ञात अशा चांगल्या गोष्टी आमच्यात आहेत, त्याही तुम्ही मांडाव्यात असा आमचा आग्रह आहे'' अशी त्यातल्या एका ज्येष्ठ कावळ्याने बाजू मांडली. त्यांना संमती देण्याखेरीज माझ्याकडे कोणताही उपाय नव्हता. नाहीतर रोज त्यांची कर्कश्श कावकाव ऐकावी लागली असती. मी संमती दिल्यावर सगळे शांत झाले.

दुसऱ्या दिवसापासून कावळ्यांनी त्यांच्या माणसांबद्दलच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि स्वत:चे गुणविशेष सांगायला सुरुवात केली. ते काकपुराण मी तुमच्यासमोर मांडत आहे.

**अथ काकपुराण:। काकस्य कृष्णवर्णस्य प्रथमोध्याय: ।**

कावळ्यांनी आपली पहिली तक्रार नोंदवली. आमचा काळा रंग तुम्हा माणसांना आवडत नाही असं आमच्या कानांवर आलं आहे. पण तुम्ही माणसे काही वेळा काळ्या रंगाचं फारच कौतुक करता हे आमच्या काकदृष्टीतून सुटलेलं नाही.

एक कावळी म्हणाली, ''कोणी स्त्री काळी चंद्रकळा नेसली की तुम्ही बायका काळया साडीचं तोंड भरुन कौतुक करता, अगबाई! या काळ्या साडीवर हे खडी प्रिन्ट किती छान दिसतंय असं म्हणता आणि मोठ्या कौतुकानं त्या 'काळ्या' साडीकडे पाहता'' त्या काळ्या साडीचं कौतुक आणि .........तिचं वाक्य पुरे होण्याच्या आत एका कवी कावळ्याने (तोंड) चोच उघडली. तो म्हणाला, ''रात्री काळ्याभोर आकाशात तारे चमचमतात. त्या ताऱ्यांचं सौंदर्य रात्रीच्या काळ्या रंगामुळेच खुलतं ना! ते सौंदर्य बघून तुमच्या कवयित्री शांताबाई शेळके म्हणतात',

**'रात्रीच्या कृष्णपटी नक्षत्रे झगमगती,**
**गमते की सुंदर त्या मंदिरी रहावे'**

एक संत वृत्तीचा कावळा म्हणाला, ''गंगेच्या शुभ्र प्रवाहात मिसळणारी यमुना सावळीच. यमुनेच्या तीरावर रासक्रीडा करणारा कृष्णही सावळाच. संत विष्णुदास म्हणतात,

**'रात्र काळी, घागर काळी।**
**यमुनाजळेही काळी हो माय।**
**बुंथ काळी, बिलवर काळी,**
**गळामुखी एकावळी काळी हो माय।।'**

आणि शेवटी तर ते म्हणतात,

**''विष्णुदास नाम्याची स्वामिनी काळी,**
**कृष्णमूर्ती बहु काळी हो माय ।।,**

अहो त्या संतांना सुद्धा काळ्या रंगाचं कौतुक वाटतं पण तुम्हाला ते कां कळू नये?''

तेवढ्यात एक गायक कावळा म्हणाला, ''अहो भावगीतातसुद्धा किती काळ्या-सावळ्या रंगांचे कौतुक आहे! बघा, '**सावळाच रंग तुझा गोकुळीच्या कृष्णापरी**' किंवा हे भजन बघा, '**राम सर्वांगी सावळा जणू चैतन्याचा पुतळा**' किंवा '**त्या सावळ्या तनूचे, मज लागले पिसे ग**' हे वाक्य पुरे व्हायच्या आत एका गायक कावळ्याने झूला म्हणून दाखवला,

**झुला झुलाये, राम दैय्या,**
**संग संग झूले सीता मैय्या ।।धृ।।**
**राम थारो सांवलो, सीतामैया गोरी,**
**हँस हँस बोले, नगरकी नारी ।**
**नजर ना लागे हटो, जाओ । झूला झूलाये...**

त्यांचं 'संगीत' ज्ञान पाहून थक्क व्हायची वेळ माझ्यावर आली.

एवढ्यात एक कर्नाटकातून पाहुणा आलेला कावळा म्हणाला, (कानडी हेल काढून) ''अहो, तुमचं ते विठ्ठल-काळंच की हो! पण संतांनी त्याला '**सुंदर ते ध्यान**' म्हटलं की हो! तुम्ही त्या काळ्या विठ्ठलाचे गुण गाता आणि आमच्या रंगाला नावं काय म्हणून ठेवता म्हणतो मी!''

एक खानदेशातून आलेला कावळा म्हणाला, ''आता पाऊस आला की शेतकरी आभाळाकडं डोळं लावून बसत्यात. त्यो काळा ढग दिसला की त्ये आनंदानं येडं होत्यात बघा. पांढरं ढग म्हंजी नुसती फोलपटं बघा. काळ्या ढगात पानी आसतंया. मंग त्ये पानी पावसाच्या रूपानं जिमिनीवर पडतंया. मंग धान्य उगवतंया. त्यासाठी तुमचं शेतकरी ज्या मातीत राबतात ना त्या मातीला म्हनतात, 'काळी माती'. तिला त्यो काळी आई म्हनतो. ही काळी आईच तुमचं प्वाट भरते. त्यो काळा रंग चालतो आणि आम्हांला मातुर नावं ठेवता!''

एक विदेश पर्यटन करून आलेला कावळा म्हणाला, ''तुम्ही माणसं इतकी स्वार्थी आहात की, अज्ञात अशा आफ्रिका खंडाला तुम्ही 'काळा खंड' म्हटलं. पण तिथे जेव्हा सोन्याच्या, हिऱ्याच्या खाणी मिळाल्या तेव्हा लगेच सगळे धावलात तिकडे. यावरून आठवलं हिरा ज्या खाणीत मिळतो तो कोळसाही काळाच बरं का!'' त्या कावळ्याचे ते भूगोलज्ञान ऐकून मला काय बोलावं ते समजेना.

तोच एक इतिहासतज्ज्ञ कावळा म्हणाला, ''टीव्हीवर मुलाखती घेणारी ऑप्रा विन्फ्रे कृष्णवर्णीयच. दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्यासाठी दीर्घकाळ तुरुंगवास भोगणारे नेल्सन मंडेलाही काळेच. कांगोच्या स्वातंत्र्यासाठी लढणारा कासावुबु, शिवाय मार्टिन ल्युथर किंग, जॉर्ज कार्व्हर...अशी किती उदाहरणे देऊ? सारे कृष्णवर्णीयच.त्यांचं मात्र कौतुक. पण आमचं मात्र कौतुक नाही. असं का?''

हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या झाडावर रहाणारा एक कावळा म्हणाला, ''आज कारखान्यांना, मोटारी, विमाने इ. गोष्टींना लागणारं खनिज तेलही काळंच बरं का, पण

त्याला काळं सोनं म्हणतात. आजच्या जगाचं आर्थिक राजकारण त्याच्यावरच अवलंबून आहे." त्याचं ते अर्थविषयक ज्ञान बघून हा कॉमर्स कॉलेजजवळच्या झाडावर रहात असावा का याचा विचार मी करू लागले.''

एवढ्यात एक कावळ्याचे पिल्लू ओरडले, ''बाबा, बाबा, त्या कवितेबद्दल सांगा ना'' बाबा कावळा म्हणाला, ''**कावळा म्हणे तो काळा, पांढरा शुभ्र तो बगळा दिसतसे**, या कवितेवर बंदी आणावी आणि ती पाठ्यपुस्तकातून काढून टाकावी असं तुमच्या शिक्षण मंत्र्याना सांगा'' हा ठराव सर्व कावळ्यांनी एकमताने काव काव करून संमत केला.

**इति काकस्य कृष्ण वर्णस्य प्रथमोध्याय : समाप्त : ।**

•

**अथ काक गुण चातुर्यस्य द्वितीयोध्याय : प्रारंभ : ।**

सर्वच कावळ्यांनी कर्कश्श काव काव करून अनेक तक्रारी नोंदवल्या. माणूस नावाचा प्राणी कावळ्यांमध्ये असलेल्या गुणांकडे चातुर्याकडे दुर्लक्ष करतो ही त्यांची मोठी तक्रार होती.

एक कावळा तीक्ष्ण दृष्टीने बघत म्हणाला, ''खरं म्हणजे आमच्या काकदृष्टीची तारीफ झाली पाहिजे. अगदी झाडाच्या वरच्या टोकावरून जमिनीवर चालणारी अळी आम्हाला दिसते. पण त्याची नजर अगदी कावळ्यासारखी आहे बरं का, या तुमच्या वाक्प्रचारात आम्हाला कौतुकापेक्षा कुत्सितपणाचाच वास येतो.''

क्रो को. ऑप. सोसायटीचा अध्यक्ष असलेला कावळा म्हणाला, ''तुमच्या नॉन-को-ऑपरेटीव्ह सोसायटीसमोर आमचं सहकार्य चांगलंच उठून दिसतं. तुम्ही एकत्र येऊन भांड भांड भांडता, पण आम्ही एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ, या न्यायाने वागतो. परवा आमच्या एका भाईबंदाचा पाय तुमच्या मुलांनी उडवलेल्या पतंगाच्या मांज्यात अडकला व तो फांदीला लोंबकळू लागला. लगेच आम्ही सर्व जमलो आणि अशी काही काव-काव केली की तुम्हाला फायर ब्रिगेडची गाडी बोलावून त्याची सुटका करावी लागली'' त्यावर दुसरा कावळा म्हणाला, ''तुमच्यातील माणुसकी संपली असली तरी आमच्यातली काकुस्की संपलेली नाही.'' काकुस्की या नव्या शब्दाने माझ्या ज्ञानात भर पडली.

एक पर्यावरणवादी कावळा म्हणाला, ''अहो, ते तुमचे रानावनात रमणारे, पक्षी निरीक्षण करणारे मारूती चितमपल्लीसुद्धा आमचं निरिक्षण करतात. त्यांनी लिहिल आहे की, आम्ही घरटी लवकर म्हणजे मे-जून मध्ये बांधायला घेतली आणि ती झाडांच्या पश्चिमेकडील फांद्यांवर असतील तर व त्यांची संख्या जास्त असेल तर पाऊस वेळेवर येणार आणि भरपूर पडणार. तुमचे हवामानाचे अंदाज चुकतील पण आमचे संकेत चुकत नाहीत, ते त्या पक्षीतज्ञाला कळलं, तुम्हाला कधी कळणार?''

एक शास्त्र विषयाची गोडी असणारा कावळा म्हणाला, ''आमच्या चातुर्याची कथा तर तुम्ही लहानपणीच शिकला आहात. एकदा एका कावळ्याला खूप तहान लागली. एका मडक्यात पाणी होतं पण अगदी तळाशी, मग आमच्या भाईबंदाने त्यात खडे टाकून ते पाणी वर आणले आणि आपली तहान भागवली. अहो, याचा अर्थ असा की आर्किमीडीजचा सिद्धांत कुणीही न शिकवता आम्हाला माहित होता आणि आम्ही त्याचा चातुर्याने उपयोग करत होतो. कळलं?''

दुसरा संशोधक कावळा म्हणाला, ''आम्ही समुद्रातले शिंपले उचलतो आणि उडत जाऊन ठराविक उंचीवरून दगडावर टाकतो, मग तो शिंपला फुटतो आणि त्यातला मांसल भाग आम्ही खातो. शिंपला खूप उंचावरून टाकला तर चुरा होतो. कमी उंचीवरून टाकला की तो फुटत नाही. आम्ही अगदी कोणीही न शिकवता योग्य उंचीवरून शिंपला टाकतो याचे काही शास्त्रज्ञांना आश्चर्य वाटले, म्हणून त्यांनी ती उंची मोजण्याचा प्रयोग केला, ती उंची बरोबर ५ मीटर भरली. बघा, म्हणजे आमच्याकडे उंची मोजण्याचे साधन नाही, ती मोजण्याचे ज्ञान नाही तरीही आम्ही नेमक्या उंचीवरून शिंपले टाकतो हे आमच्या बुद्धिमतेचं द्योतक नाही कां?'' मला काय बोलावे ते सुचेना, कारण तो जे म्हणत होता ते अगदी खरं होतं.

तेवढ्यात न्युझीलंडहून इथे पाहुणा म्हणूनआलेला कावळा म्हणाला, ''आमच्या इथे ऑकलंड विद्यापिठात सारा जेलबर्ट या महिलेने आमच्या जातिबांधवांवर सखोल अभ्यास करून सिद्ध केले की, कावळ्यांमध्ये सात वर्षांच्या मुलाएवढी बुद्धिमत्ता असते. आमच्यातली न्यु कॅलेडोनिया ही जात फारच हुशार असते.'' ''हो का! मी हे नविनच ऐकले आहे'' असं मी म्हणेपर्यंत एक भाषातज्ज्ञ कावळा म्हणाला, ''अहो, माझं ऐका ना. रॅवेल जातीच्या कावळ्यांना तुमची माणसांची भाषा प्राथमिक पातळीवर शिकवता येते, म्हणजे आम्ही तुमचे काही शब्द, वाक्ये बोलू शकू. पण तुम्ही आमची भाषा शिकाल कां? आहे का तेवढी तुमची बुद्धिमत्ता?'' खरंच गहन प्रश्न होता. आपल्याला काव-काव शिवाय काय येतं? आणि त्या शब्दांचा नेमका अर्थ तरी कुठे माहीत आहे आपल्याला? मी माझ्याच विचारात गर्क झाले.

तेवढ्यात एक कावळी म्हणाली, ''अहो बाई, लक्ष कुठे आहे तुमचं?, आम्हालासुद्धा तुमच्यासारख्या सुखदु:खाच्या भावना असतात बरं का! आणि आमच्यात तुमच्यासारखी वाजंत्री वाजवून लग्ने होत नसली तरी आमच्यातल्या काही जाती मरेपर्यंत एकमेकांशी एकनिष्ठ असतात.'' ''हे पण संशोधनातून सिद्ध झालंय कां?'' मी विचारलं. ''हो तर, एकूण आमच्या ४५ जातीचे संशोधन झालं आहे, त्यातून खूप माहिती मिळाली आहे.''

तेवढ्यात एक फांदीवरचा कावळा म्हणाला, ''पण तुम्ही आम्हाला नांवे ठेवायची एक संधी सोडत नाही. एखादी वाईट गोष्ट योगायोगाने झाली तर तुम्ही लगेच म्हणता, कावळा बसायला आणि फांदी तुटायला गाठ पडली. आता मला सांगा ती फांदी वाळलेली असेल तर कोणताही पक्षी बसला तरी ती तुटणारच ना?, पण ते पाप तुम्ही आमच्या नांवावरच का फोडता?'' इतक्यात एका लहानशा डबक्यात पटकन आंघोळ करून आलेला कावळा पंख झाडत म्हणाला, ''खरंच, कां हो नावे ठेवता आम्हाला?'' ''आता तुला कुठे मी काय म्हटलंय?'' मी म्हटलं. ''अहो, सकाळच्या घाईगर्दीच्या वेळी गाणी म्हणत तासभर बाथरूम अडवली नाही म्हणून त्याचे आभार मानायचे की आमच्या नावाने त्याचा उद्धार करायचा? आणि असं बघा, प्रत्येक पक्ष्याला दोनच पंख असतात ना! ते भिजवायला कितीसा वेळ लागणार?, पण पटकन आंघोळ होते (तुमच्या मते उरकते) ती फक्त कावळ्याचीच असे जणूं तुम्ही शिक्कामोर्तबच केले आहे.''

त्याची कशी समजूत घालावी विचारात असतानाच एका प्रौढ कावळीने आपल्या पिल्लांना घास भरवत विचारले, ''काय गं, तुझ्या पोटातून कधी काव-काव आवाज येतो का?''

मी घाबरून पोटाला हात लावला आणि म्हटलं, ''छे! बाई, कधीच नाही.''

''काय गं, मग खूप भूक लागली की, तुम्ही माणसं पोटात कावळे काव-काव करताहेत असे का म्हणता?, खरं म्हणजे तुम्हाला भूक लागली आहे याची आठवण करून दिल्याबद्दल तुम्ही आमचे आभारच मानले पाहिजेत.''

मी मनात विचार केला, खरंच आपण कितीतरी वेळा कामात गुंतलेले असतो तेव्हा जर भुकेची जाणीव ह्यांच्यामुळे होत असेल तर त्यांचे आभार मानायला हवेत. म्हणून त्यांच्याकडे बघितलं तर त्या तिघांची नाके (चोची) रागाने जरा लाल झाल्यासारखी वाटली, मी काही बोलण्याआधीच त्या तिघांनी कर्कश्श काव-काव करून या सर्व वाकप्रचारांबद्दल नापसंती व्यक्त केली.

एक नवविवाहित कावळी म्हणाली, ''काय हो, जगात किती तरी माणसं खोटे बोलतात. ते पुढारी तर सतत खोटंच बोलतात, पण तुम्ही त्यात आमचं नाव का ओढता?''

''छे! गं बाई, आम्ही काही करत नाही'' मी म्हटलं. त्यावर कावळी म्हणाली, ''नाही कसं? तुम्ही म्हणता ना, '**झुट बोले कौवा काटे, काले कौवे से डरियो**', आमचंच नाव का घेता? झुट बोले, चिडिया काटे किंवा कबूतर काटे असं का म्हणत नाही? त्या कबूत्तराला मात्र, कबूत्तर जा जा जा, असे प्रेम संदेश आणि आमच्या माथी झूट बोले काय? शोभतं का हे तुमच्या जातीला?....पण त्या गाण्यातली दुसरी ओळ मात्र मला आवडते बरं कां'' मी विचारलं, ''ती कोणती?'' कावळी फांदीवर नाचत म्हणाली, ''**मै मायके चली जाऊंगी तुम देखते रहियो**, हल्ली ही ओळ म्हटली की सारं काही माझ्या मनासारखे होते'' तिचा बेरकीपणा बघून मला हसू आले. तर म्हणते कशी ''हसू नका, माझा हा संदेश व्हॉट्स अप वर पाठवा, किंवा फेसबुकवर टाका, बघा किती लाईक येतील ते'' तिचं मोबाईल ज्ञान ऐकून मी थक्क झाले आणि मौन सर्वार्थ साधनम्, असं म्हणून गप्प बसले.

**इति काकगुण चातुर्यस्य द्वितीयोध्याय: समाप्त:।**

**अथ काकरवस्य तृतीयोध्याय: प्रारंभ:।**

सर्व संगीतज्ञ, गायक कावळ्यांनी पुढील तक्रारी मांडल्या. ''आमची काव-काव तुम्हाला आवडत नाही. कर्कश्श वाटते, आवाजात माधुर्य अजिबात नाही, कधी खर्जात तर कधी तार स्वरात आम्ही ओरडतो अशी तुमची तक्रार आहे. पण एका संशोधनात (अरे! इथे पण संशोधन आहे वाटतं) हे सिद्ध झालं आहे की, रॅव्हेन, जातीच्या कावळ्यांना ऑपेरा संगीत शिकवता येते आणि ते सुरेल गाऊ शकतात. माहित आहे तुम्हाला?'', मला हे खरंच माहित नव्हतं.

तेवढ्यात एक कावळी म्हणाली, ''तुम्हाला आमचा आवाज कर्कश्श वाटतो आणि त्या कोकिळाचा आवाज तेवढा अगदी गोड वाटतो ना?, पण आम्ही त्याच्या बायकोसारख्या लबाड नाही. ती माझ्या घरट्यात येऊन माझे अंडे पायाने ढकलून देते आणि त्या जागी आपलं अंडे ठेवते. हे सारे तुम्ही माणसांनीच निरीक्षण करून लिहून ठेवलं आहे, मी आपली भोळी-भाबडी, अंडी पायाने चाचपून बघते, आकडा बरोबर आला की शांत होते.''

दुसरी तिची शेजारीण कावळी तावातावाने म्हणाली, ''ती कोकीळा नुसते अंडे ठेवते असं नाही तर नंतर त्या अंड्यातून बाहेर आलेलं पिल्लूही आम्हीच वाढवतो बरं, तिकडे तो कोकिळ गात असतो आणि पोरांना आमच्याकडे टाकून ही बया कोकिळा त्याच्याबरोबर उनाडत असते. त्या आळशी काळ्या कोकिळेचे तुम्हाला कौतुक आणि कष्ट करून तिची पोरं वाढवणाऱ्या आम्हाला मात्र नावं ठेवता?''

एवढ्यात एक कावळा जोराने ओरडला व म्हणाला, ''नीट ऐका, तुम्हाला आमची आठवण कधी होते माहिती आहे?, एखादी व्यक्ती मृत्यू पावली आणि दहाव्या दिवशी आमच्यापैकी कोणी पिंडाला शिवले नाही तर तुम्ही स्वत:च काव-काव असं म्हणून आम्हाला हाका मारता. आणि आम्ही जर पिंडाला स्पर्श केला तर तुम्हाला हर्षवायूच व्हायचा बाकी राहिलेला असतो.''

तेवढ्यात, एका सिनेमाचे शुटींग पाहून आलेला स्वत:ला हिरो समजणारा कावळा म्हणाला, ''अहो, तो तुमचा प्रसिद्ध काकस्पर्श सिनेमा आमच्यावरच काढला आहे, आम्ही खरे हिरो आहोत त्यातले'' मी म्हटलं....''अहो, काहीतरीच काय सांगता'' ''मग खोटं आहे की काय?, अहो, आम्ही त्या पिंडाला शिवलो नाही म्हणून त्या मोठ्या भावाला त्याच्या धाकट्या भावाच्या आत्म्याला वचन द्यावे लागले. ते वचन पाळण्यासाठी पुढचा सिनेमा घडला. आलं का लक्षात?'' मी आपली मुकाट्याने मान डोलावली.

एक सासुरवाशीण कावळी म्हणाली, ''तुम्हाला आमची काव-काव आवडत नाही. पण एखाद्या सासुरवाशीणीला ती अगदी शुभ वाटते हो! तिला वाटतं की तिचा भाऊ किंवा माहेरचं कोणी माणूस आज भेटायला येईल कां?''
एका संगीतज्ञ कावळ्याने माझ्या ज्ञानात भर घातली. तो म्हणाला, ''अहो, तुमचे ते प्रसिद्ध गायक भीमसेन जोशी यांनी कोमल रिषभ आसावरी राग गाताना हा शुभशकून सांगितला आहे. ते म्हणतात...कगवा बोलई रे सो अब मोरे पियाको सगूण विचारो।''

एक ज्ञानेश्वराचे भजन ऐकणारा कावळा म्हणाला, ''अहो, तुमचे ते संत ज्ञानेश्वर किती थोर हो!, ते तर आमचं स्वागतच करतात, ते म्हणतात,

**पैल तो गे काऊ कोकताहे,**
**शकून गे माये सांगताहे।**

बघा, बघा, कसं गोड शब्दात ते काऊ म्हणतात. कारण आम्ही काव-काव करुन शकून सांगतो. नाही तर तुम्ही...कावळ्या, कावळ्या म्हणता. संत ज्ञानेश्वर पुढे म्हणतात,

**उड उड रे काऊ । तुझे सोन्याने मढविन पाऊ**
**पाहुणे पंढरी राऊ । घरास येती ।**

इतकेच नाही तर दुधे भरली वाटी, लाविन तुझे तोंडी, असं म्हणून आमच्यासाठी दुधाची वाटी ठेवतात. हे थोर संत जे म्हणतात ते खोटं असेल कां?''

त्यानंतर एक ज्येष्ठ नागरिक कावळा म्हणाला, ''तुम्हां ज्येष्ठ नागरिक माणसांना जास्त सांगायला नको, तुम्ही सुज्ञ आहात, आमचा दु:स्वास करू नका, आमचं महत्व लक्षात घ्या, आम्हाला गोड आवाजात काऊ म्हणा, आमच्यावर माया करा, लहान नातवंडांना भरवतांना हा घास काऊचा असं म्हणून खरोखरी दोन घास आम्हाला ठेवा आणि आमचा दुवा घ्या.''
त्यानंतर ते कावळे एका सुरात ओरडले, ''हे सर्व तुमच्या ज्येष्ठ नागरिक संघात सांगा'' एवढं बोलून सगळे भुर्रकन उडून गेले आणि मी त्यांना शब्द दिल्याप्रमाणे भाषणाच्या तयारीला लागले.

**इति काकपुराण: समाप्त:।**

**-सौ. विद्या पेठे**
**9969560666**

## ।। आरोग्यं धनसंपदा ।।

# आयुर्वेद-निरामय-सुखी जीवनाचे शास्त्र

-वैद्य सुभाष मार्लेवार

**मन व शरीर दोषांचा संबंध :**

वात, पित्त व कफ या तिन्ही दोषांचा परिणाम मन व मनाच्या कार्यावर होतो. 'नियंता प्रणेताच मनस:।' असे वर्णन वायुच्या कार्याचे आहे.

प्राणवायु : मनाचे व बुद्धिचे धारण करतो.

उदानवायु : बुद्धिने केलेल्या निश्चयाचा त्याग करावा की स्वीकार हे ठरवले जाते.

व्यानवायु : हा वायु मनात चंचलत्व निर्माण करतो.

समानवायु : मन, बुद्धिसाठी पोषक द्रव्ये हृदयाकडे आणतो.

अपानवायु : हा शुक्राचे धारण करून ओजोवृद्धी करतो व यावरच बुद्धिचे मनाचे उपबृंहण करतो.

साधक पित्त : मनाचे व बुद्धिचे उपबृंहण करते.

अवलंबक कफ : हा बुद्धिचे पोषण करतो. हे 'श्लैष्मिक ओज' होय. उपनिषदांत आत्मा, बुद्धी, मन व इंद्रिय, त्यांचे विषय यांचा संबंध उत्कृष्ट रीतीने सांगितला आहे. त्यानुसार आत्मा हा रथाचा मालक, शरीर म्हणजे रथ, बुद्धी ही सारथ्याचे म्हणजे रथ हाकण्याचे काम करते. त्यासाठी तिने आपल्या हातात मनरुपी चाबूक धरला आहे. या रथाला पंचज्ञानेंद्रिय हे पाच घोडे जुंपलेले आहेत व ते आपापल्या विषयाच्या मार्गाने जोरदार पळत आहेत. बुद्धी ही मनाच्याद्वारे रथास आवरत आहे व रथ योग्य मार्गाने जोरदार जाण्यास प्रवृत्त करत आहे.

**दोष विज्ञान :**

**विसर्गादानविक्षेपै : सोमसूर्यानिला : यथा ।**
**धारयन्ति जगद्देहं कफपित्तानिलास्तथा ।।**
सु.सू. २२/८

विसर्ग म्हणजे संयोग (संग्रह), आदान म्हणजे पचन आणि विक्षेप म्हणजे वियोग (उत्सर्जन) अश क्रिया करून अनुक्रमे चंद्र, सूर्य व वारा सृष्टीचे धारण करतात तसेच कफ, पित्त व वायु मानवी देहातील सर्व क्रिया करून देहाचे धारण करतात.

त्रिदोष देहोत्पत्तीस कारणीभूत आहेत. हे त्रिदोष शुक्र व आर्तव स्वरूपात बीजांत असतात व आत्म्याच्या साक्षित्वामुळे ते अविकृत देह निर्माण करतात. प्रारंभी देह अतिसूक्ष्म असतो. त्यांच्यात असंख्य परमाणु निर्माण होऊन त्यांचा परमाणुसंयोग हा कफामुळे होतो. पित्तामुळे परिवर्तनाचे कार्य होते किंवा या क्रिया घडवण्यासाठी पचनाची आवश्यकता असते. ते कार्य पित्त करते. या गर्भशरीरात वियोजन करुन भेद, पोकळी, अवकाश निर्मितीचे कार्य व विसर्जनाचे कार्य वायु करतो.

**पंचमहाभूतांना त्रिदोषाणांचा संबंध :**

शरीर पंचमहाभूतापासून बनले आहे तसेच ते त्रिदोषांपासूनही बनले आहे. असे दोन सिध्दांत झाले. या दोन सिध्दांताचा समन्वयही आयुर्वेद शास्त्राने केला आहे. कारण त्रिदोषही पंचमहाभूतांपासून निर्माण झाले आहेत. पृथ्वी व जल महाभूताच्या आधिक्याने कफ, तेज महाभूताच्या आधिक्याने पित्त, वायु आणि आकाश यांच्या आधिक्याने वात निर्माण होतो.

वायु : आयुर्वेदातील मूलतत्वापैकी सर्वात महत्वाचे तत्व वायु हे आहे. 'वायु' याचा अर्थ गतिमान पदार्थ.

पंचमहाभूतांपैकी वायु व आकाश महाभूताचे यात प्राधान्य आहे.

**स्वरुप : अव्यक्त : व्यक्तकर्मा च।**

वायु अदृश्य आहे, प्रत्यक्ष दिसत नाही. केवळ कार्यावरून तो ओळखायचा असतो. म्हणून त्याला 'व्यक्तकर्मा' (भासमान होणारा) म्हटले आहे.

**वायुचे गुण :**

१) रुक्ष : यामुळ शरीरातील द्रवांशाचे शोषण होते.

२) लघु : यामुळे शरीर परमाणुंत हलकेपणा येतो. म्हणूनच उपवास व व्यायाम या वात वाढविणाऱ्या क्रिया केल्यास शरीराला हलकेपणा येतो.

३) शीत : या गुणाने स्तंभन हे कार्य केले जाते. यामुळे स्त्रोतसे आकुंचित होतात.

४) खर : या गुणामुळे धातू झिजवून त्यांचे आकारमान कमी केले जाते. स्थूल शरीराला कृश करण्यासाठी मेद व मांसाचे कर्षण होणे आवश्यक असते व त्यासाठी वायुच्या या खर गुणाचा उपयोग होतो.

५) सूक्ष्म : या गुणामुळे वायुला सूक्ष्मातिसूक्ष्म स्त्रोतसांमध्ये कार्य करता येते. या गुणामुळे वायु सर्व शरीरभर कार्य करू शकतो.

६) चल : या गुणामुळे वायु शरीरस्थ अवयवांना गतीची प्रेरणा देऊ शकतो. उदा. रक्ताभिसरण, हृदय, फुफ्फुसांना गती.

७) योगवाही : हा वायुचा अत्यंत महत्वाचा गुण आहे. जे द्रव्य दुसऱ्या द्रव्याशी मिश्र केले असता, ज्यात मिश्र केले त्या द्रव्याचे गुण वा क्रिया वाढवते त्या द्रव्याला योगवाही म्हणतात. योगवाही द्रव्य आपले स्वत:चे गुण, संयुक्त केलेल्या द्रव्याच्या आड कधीच आणत नाही.

**योगवाह : परं वायु : संयोगात् उभयार्थकृत् ।**
**दाहकृत्तेजसा युक्त : शीतकृत्सोमसत्यात् ।।**


वायुचा तेज तत्वाशी संयोग झाला तर उष्ण होतो व जल तत्वाशी संयोग झाला तर शीत होतो. शीत व उष्ण अशा दोन्ही क्रिया करणारा वायु असल्याने त्यास योगवाही म्हटले जाते.

८) विशद : या गुणामुळे वायु क्लेदाचे शुद्धिकरण करतो.

९) दारुण : या गुणामुळे पदार्थातील मार्दव जाऊन त्याला कठिणपणा येतो.

वायो : पंचभेदा : सर्व शरीरभर वात ही एकच शक्ति आहे परंतु तिच्या स्थान व क्रिया वैशिष्ट्यानुसार वायुचे पाच प्रकार केले आहेत.

(क्रमश:)



**वैद्य सुभाष मार्लेवार**
9819686299

Vaibhav Prabhudesai
09967534396
09773510513

Mrudul Prabhudesai
09967534397


# उन्नयन

## UNNAYAN TOURS

"Let's Explore The Offbeat Destinations Together..."

**उन्नयन** ह्या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे उत्कर्ष अथवा प्रगती. सर्वसामान्य लोकांना काहीश्या अपरिचित अशा वेगळ्या पर्यटन स्थळांच्या सहली आम्ही आयोजित करीत असतो. ह्या नेहमीपेक्षा थोड्या वेगळ्या पर्यटन स्थळांच्या सहली आयोजित करण्यात आमचा मुख्य उद्देश असतो तो तुमच्या कल्पनेच्या पलिकडील जग तुम्हाला दाखविण्याचा. ह्या सहलींमधून एक वेगळंच विश्व आपल्या नजरेसमोर समोर येतं; जे आपल्या देशाची संस्कृती, निसर्गसौंदर्य, कला, समाजजीवन आपल्याला उलगडून दाखवतं.

## उन्नयनच्या अपरिचित पर्यटन स्थळांच्या सहली

### ज्येष्ठ नागरिक विशेष सहल - किल्ले रायगड (रोपवे मार्गे)

**दि. ३ आणि ४ ऑक्टोबर २०१५ (सहल खर्च - रु. ३,९५०)**

ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून ५० वर्षांवरील सर्वांसाठीची ही खास सहल. किल्ले रायगड ह्या विषयावर पी.एच्.डी. केलेल्या डॉ. मिलिंद पराडकर यांचे विशेष मार्गदर्शन. ज्येष्ठ नागरिकांच्या बहुतेक सर्व गरजा लक्षात घेऊन सहलीचे आयोजन.

### अंदमान (हॅवलॉक आयलंडसह)

**दि. ०४ ते १० डिसेंबर २०१५ (सहल खर्च - रु. २४,७५०* )**

निसर्गसौंदर्याची मुक्त उधळण असलेला हा भूलोकीचा स्वर्गच! सोबत 'आशियातील सर्वोत्तम बीच' असलेल्या हेवलॉक आयलंडवरील राधानगर आणि एलिफंट बीचला खास भेट. सेल्युलर जेलचा विशेष लाईट आणि साउंड शो.

### आनंदवन - हेमलकसा - सोमनाथ

**१) १५ ते १८ ऑक्टोबर २०१५, २) १ ते ४ नोव्हेंबर २०१५, ३) १५ ते १८ नोव्हेंबर २०१५, ४) ११ ते १४ फेब्रुवारी २०१६ (सहल खर्च - रु. ७,७५०)**

बाबा आमटे यांनी सुरु केलेल्या आणि त्यांचे सुपुत्र डॉ. विकास व डॉ. प्रकाश आमटे ह्यांनी अथक परिश्रमातून वाढवलेल्या जगावेगळ्या प्रकल्पांना प्रत्यक्ष अनुभवण्याची ही सुसंधी.

### आसाम-मेघालय

**दि. २४ ते २९ डिसेंबर २०१५ (सहल खर्च - रु. २५,७५०*)**

एकशिंगी गेंड्यासाठी प्रसिद्ध असलेले काझीरंगा अभयारण्य आणि सर्वाधिक पावसासाठी प्रसिद्ध असलेल्या चेरापुंजीसह देशाच्या अतिपूर्वेकडील राज्यांची ही विलोभनीय सफर.

### लोणार सरोवर

**दि. २४, २५ ऑक्टोबर २०१५ (सहल खर्च-रु. ४,९५०*)**

५० हजार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे तयार झालेले आशियातील सर्वात मोठे आणि जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर. लोणार सरोवराच्या अभ्यासकांसोबत खास चर्चेचे आयोजन.

### पंजाब आणि चंडीगड (वाघा बॉर्डरसह)

**दि. ६ ते १० जानेवारी २०१६ (सहल खर्च - रु. १७,४५०*)**

अमृतसरचे सुवर्णमंदिर, जालियानवाला बाग, वाघा बॉर्डर व शहीद भगतसिंग यांचे मूळ निवासस्थान यासोबत पंजाब आणि चंडीगडमधील प्रसिद्ध पर्यटनस्थळांची खास सफर.

### राळेगणसिद्धी - हिवरे बाजार - स्नेहालय

**दि. २८ आणि २९ नोव्हेंबर २०१५ (सहल खर्च - रु. ३,९५०)**

'भारतातील आदर्श गाव पुरस्कार' मिळालेले हिवरे बाजार, अण्णा हजारेंचे सुनियोजित राळेगणसिद्धी आणि समाजातील पीडित स्त्रिया, बेवारस मुलांसाठी काम करणारी व 'सत्यमेव जयते'तून जगासमोर आलेली डॉ. गिरीश कुलकर्णींची 'स्नेहालय' संस्था या सर्व स्थळांना भेट देणारी ही अनोखी सामाजिक सहल.

### ओरिसा

**दि. १७ ते २० जानेवारी २०१६ (सहल खर्च - रु. १४,७५०*)**

कोणार्कचे जगप्रसिद्ध सूर्यमंदिर आणि जगातील दुसऱ्या क्रमांकाचे खाऱ्या पाण्याचे सरोवर असलेले चिल्का लेक यांच्यासह ओरिसा राज्याची ही एक वेगळी सहल.

* सहल शुल्कामध्ये प्रवासखर्च अंतर्भूत नाही. मात्र रेल्वे अथवा विमानाच्या तिकीटाव्यतिरिक्त इतर कोणतेही जादा शुल्क न घेता आम्ही ह्या सहलीसाठी आपले तिकीट आरक्षित करून देतो. विमान प्रवासाची तिकिटे लवकर आरक्षित केल्यास अधिक सवलतीच्या दरात उपलब्ध होत असल्याने आपली जागा शक्यतो लवकर निश्चित करावी.

---

### व्याघ्र पर्यटन :-

**कान्हा अभयारण्य** - एप्रिल २०१६

**ताडोबा अभयारण्य** - एप्रिल २०१६

**रणथंभोर अभयारण्य** - एप्रिल २०१६

### आंतरराष्ट्रीय सहली :-

**श्रीलंका** - जानेवारी २०१६

**केनिया (मसाई मारासह)** - मार्च २०१६

- सर्व सहलींसाठी मर्यादित जागा उपलब्ध आहेत.
- सहल शुल्क सर्वसमावेशक असून प्रवास खर्च, निवास खर्च, भोजन, सर्व्हिस टॅक्स, प्रवास विमा असे सर्व खर्च त्यामध्ये अंतर्भूत आहेत. मात्र ह्यापैकी कोणत्याही घटकाचे दर वाढल्यास त्यानुसार सहल खर्चात वाढ होऊ शकते.
- रेल्वे आरक्षण १२० दिवस अगोदर होत असल्याने कन्फर्म तिकिटासाठी किमान ४ महिने अगोदर संपर्क साधावा.
- वरील सहलींव्यतिरिक्त इतर सर्व पर्यटन स्थळांच्या सहली आम्ही तुमच्या सोयीनुसार खास तुमच्यासाठी आयोजित करून देतो.
- ज्येष्ठ नागरिक संघ, शाळा-कॉलेजच्या स्टडी टूर्स तसेच इतर ग्रुप्स, ऑफिसच्या कॉर्पोरेट टूर्स आम्ही विशेष सवलतीच्या दरात आयोजित करून देतो.
- अधिक माहितीसाठी आमची वेबसाईट www.unnayan.net येथे संपर्क साधावा अथवा info@unnayan.net ह्या पत्त्यावर इमेल पाठवावे.

Think of a
Dharmic Vidhi,
Think of

OPANDIT™
SHUBHAM BHAVATU



सर्व धार्मिक विधींसाठी !
संपूर्ण सामग्रीसहित शास्त्रशुद्ध पद्धतीने
धार्मिक विधी करणारी एकमेव संस्था.

आमची वैशिष्ट्ये :

- ३० हून अधिक गुरूजी आणि पुरोहिता उपलब्ध
- उच्च प्रतीचे पूजेचे साहित्य
- चौरंग, पाट, होमकुंड, लाकडे, माती, फुले, फळे, तोरण सहित विधीची व्यवस्था

लहान मुले/मुली आणि बाळांसाठी :
बारसे, उष्टावण, जावळ, वाढदिवस, मुंज

वधू आणि वर यांसाठी :
लग्न, साखरपुडा

ज्येष्ठ नागरिकांसाठी :
साठीशांत, पंच्याहत्तरी, ऐंशी वर्षाची शांत

इतर पूजा आणि शांती :
सत्यनारायण, उदकशांती, वास्तुशांती, सहस्त्रावर्तन, लघुरुद्र

श्राद्ध विधी :
मंत्राग्नी विधी, हिरण्य श्राद्ध, सपिंडक श्राद्ध, अंत्येष्ट विधी

मुंबई + उपनगरे + ठाणे

+91-9167968204
mrudula.barve@opandit.com
www.oPandit.com



Dream Comes True! Pay 10% only.



(Work Started)
Project Approved by ICICI.

Book Your Flat
in Vile Parle (East)

OFFER 10:10:80 Scheme.
1/2/3/4 BHK Flats Available.
Datta Ramanand Society,
Hanuman Cross Rd. No.2
Complex with
Latest Amenities.

Chheda Modak
Estate Consultant
Vile Parle/ Andheri/ Santacruz/ Goregaon

Sales - 09821330817
08080701110



हे मासिक सौ. कल्पना साठे यांनी ब्राह्मण सेवा मंडळ यांचेसाठी नवलाई प्रिंट हाऊस प्रा. लि. पाईपलाईन, अंधेरी पूर्व येथे छापून ब्राह्मण सेवा मंडळ, भवानीशंकर रोड, दादर येथे प्रसिद्ध केले.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संचालक व संपादक सहमत असतीलच असे नाही.